म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वाङ्‌मा.
दा. क्र. १४०३८

IRBS-0114938

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
वा. क्र. ५११६



## समर्पण

त्या असंख्य देशबांधवांना—
ज्यांनी रणांगण आपल्या
रक्ताभिषेकाने पुनीत केले.


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
क्रमांक ३५७८ नोंद दि. ११/१/८४

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २६०३८ नो. दि. .........
वि. वाङ्मय क्र. .....

IRBK-0114038

## खास मुलांसाठी आमची प्रकाशने

| | किंमत |
|---|---|
| १) असे होते चाचा नेहरु | २–४० |
| २) असे होते गांधीजी | २–०० |
| ३) अशी होती कस्तुरबा | २–०० |
| ४) गुणी प्रकाश | २–०० |
| ५) स्वप्नरेषा | ३–७० |
| ६) गोड पुरवणी वाचनमाला | |
| इयत्ता दुसरी भाग १ व २ प्रत्येकी | ०–६० |
| इयत्ता तिसरी भाग १ व २ प्रत्येकी | ०–९० |
| इयत्ता चौथी भाग १ व २ प्रत्येकी | १–२० |
| ७) झांशीची राणी | (येत आहे) |
| ८) नानासाहेब पेशवे | ( ,, ) |
| ९) फेनाली | ( ,, ) |
| १०) हिमाली | ( ,, ) |

### आणि थोरांसाठी

| | |
|---|---|
| १) माझे पति माझे दैवत | ६–०० |
| २) दिल्लीत दहा वर्षे | ६–०० |
| ३) बर्लिन गंगेला मिळाले | ६–५० |

## इंडिया पब्लिशिंग हाऊस छापत आहे

सुंदर रंगीत चित्रे असलेली छानदार

नवल कथा व परीकथांची पुस्तके

### कि ल बि ल

पुरवणी वाचन पुस्तके

इ. २ री, ३ री व ४ थी साठी

लेखिका : सौ. सुमती पायगांवकर

अनुक्रम ... क्रमांक ....३५१८.... नोंद दि.

## एक

**घोडेस्वारांची** एक छोटीशी तुकडी भरधाव दौडत चालली होती. सर्वांच्या पुढे राजकुमारी दुर्गावती व तिचे वडील होते. सोळा वर्षांची राजकुमारी दिसायला फारच सुंदर होती. शरीराने बळकट व प्रत्येक अवयव रेखीव असल्याने ती डौलदार दिसे. तिच्या पाठीवर ढाल व कमरेवर तलवार लटकली होती व उजव्या हातात लांबट बर्छा होता.

कीर्तिरायने आपला लगाम किंचित सैल सोडल्याबरोबर घोड्याने वेग अधिक वाढवला. राजकुमारीने आपल्या वडिलांकडे पाहून आपल्या घोड्यास टाच मारली. तिचा घोडा वाऱ्यापेक्षाही वेगाने पळू लागला. तिने वडिलांना मागे टाकले. ते मनातून खूष झाले व ओरडून म्हणाले, 'थांब दुर्गा ! थांब !'

राजकुमारीने मागे वळून पाहिले व घोड्याचा वेग कमी केला. थोडे अंतर गेल्यावर घोडा थांबला. कीर्तिरायने जवळ जाऊन तिच्या पाठीवर थापटून शाबासकी दिली व दाटलेल्या आवाजात म्हणाले, 'शाबास, मुली, शाबास ! माझ्या........'

राजकुमारी मध्येच उद्गारली, 'नाही. आत्ताच मी शाबासकी घेणार नाही. कारण घोडा वेगाने दौडविण्यात काही बहादुरकी नाही. चित्त्याची शिकार करण्यासाठी आपण निघालो आहोत, त्यात जर मला यश आले तर शाबासकी द्या.'

ती घोड्यावरून उडी मारून खाली उतरली.

कीर्तिराय पण खाली उतरले. त्यांचे मागे सुमारे पंधरा-वीस घोडेस्वार होते. ते आपापल्या घोड्यांवरून उतरून पद्धतशीरपणे ओळीने उभे राहिले.

‘ होय, पण ही शिकार मी करणार ! या वाघाला मीच ठार करीन ! कृपा करून कसलीही मदत तुम्ही करू नका. ’

वडील म्हणाले, ‘ जर तुझे तसे म्हणणेच आहे तर आम्ही काही मदत करणार नाही ! ’

राजकुमारी सावधगिरीने हळूहळू पुढे जाऊ लागली. पाठीमागे कीर्तिराय आणि दोन्ही सैनिक होते. वाघ खाली तोंड करून झऱ्याचे पाणी पीत होता. राजकुमारीने थोडे पुढे जाऊन सर्वांना थांबवून ठेवले. आणि ती एकटीच झाडीच्या बाजूला जात होती, तोच वाघ अगदी जवळ आला. तिने बरोबर नेम धरून कट्यार वाघावर फेकली. तिचा नेम थोडासा चुकला आणि कट्यार पोटात न लागता पाठीमध्ये घुसली होती.

वाघ व्याकूळ होऊन भयंकर गर्जना करून चवताळून राजकुमारीकडे वळला. तेव्हा तिने तावडतोब आपली तलवार म्यानातून बाहेर काढली. त्याच वेळी वाघ राजकुमारीवर नजर रोखून पाहात होता. नंतर त्याने तिच्यावर एकदम झडप घेतली. कदाचित त्याने एकदम राजकुमारीला फाडून खाल्ले असते, परंतु मध्येच एक कट्यार त्याच्या मानेतून आरपार निघून गेली. वाघ खाली पडला आणि बरीच तडफड केल्यावर त्याचा प्राण गेला. कीर्तिरायने राजकुमारीला लढण्याची संधी दिली नाही. कारण त्यांना फार भीती वाटली; आपली लाडकी कन्या वाघाच्या झपाट्यात सापडेल व ती जखमी होईल, म्हणून त्यांनी आपली कट्यार फेकून त्याला जमीनदोस्त केले. परंतु आपल्या वडिलांची ती मदत राज-कुमारीला आवडली नाही. ती मनातून कष्टी झाली आणि आपल्या वडिलांना म्हणाली, ‘ माझ्या शिकारीवर वार करण्याचा आपल्याला काय अधिकार होता ? आपण तर कोणत्याही प्रकारची मदत देणार नाही असे वचन दिले होते मग कट्यार कशाला फेकलीत ? आपण असे समजलात का, की मी त्याच्या आक्राळ विक्राळ अशा भयंकर स्वरूपाला भिऊन

त्याच्या बरोबर लढत देऊ शकले नसते? जोपर्यंत मी दुसरी शिकार नाही करू शकत तोपर्यंत आज मी घरी नाही जाणार!' राजकुमारी लहान मुलासारखी धुसफूस करू लागली. ते पाहून कीर्तिराय हसले व तिच्या पाठीवर प्रेमळपणाने हात फिरवीत म्हणाले, 'मुली, माझं वडिलांचं अंतःकरण आहे. मला माहीत होतं, की वाघ तुला काही करू शकणार नाही. तरी पण मी स्वतःला आवरू शकत नव्हतो. मला राहवले नाही. मुली रागावू नकोस. मी प्रेमवश होऊन कट्यार चालवली होती. सगळ्यांनाच असे हे वात्सल्यप्रेम मोहवून टाकते. तेव्हा दुर्गा, तुझे शौर्य आणि धाडस जेवढे वर्णावे तेवढे थोडेच आहे. चल आता परत फिरू. यापुढे पुन्हा दुसऱ्या वेळेस तुला कोणत्याही तऱ्हेची मदत देणार नाही. तू एकटीच शिकार कर. मग तर झाले ना?' राजकुमारी थोडी नाराजच झाली परंतु आपल्या वडिलांबरोबर ती परत आली. त्यांच्या मागून दोन्ही सैनिकांनी त्या शिकार केलेल्या वाघाला उचलून आणला.

क्रमांक ३५१७ नोंद दि. ५-५

# दोन

एके काळी चंदेल राजपूत फार पराक्रमी व शक्तिवान होते. त्यांनी आपल्या पराक्रमावर आणि एकतेच्या बळावर एक राज्य स्थापन केले होते. त्यामध्ये महोबा, कालिंजर, खजुराहो वगैरे आसपासचा प्रदेश सामावलेला होता. ह्यांच्या पराक्रमाने भिऊन शेजारच्या राजाने त्यांची गुलामगिरी स्वीकारली होती. अशा प्रकारे राजपूत राज्याच्या सीमा फार वाढल्या होत्या.

काळ भराभर चालला होता. चंदेल राजपुतांची शक्ती वाढत होती आणि त्याबरोबरच राज्य आणि मान-सन्मान वाढत होता. परंतु हे सर्व वैभव फार दिवस टिकले नाही. त्यांच्यामध्ये द्वेष, मत्सर ह्यांची बीजे दिसू लागली व भांडणे होऊन दुफळी माजून राहिली. छोट्या छोट्या गोष्टींवर ते भांडणे करून एकमेकांचा द्वेष करू लागले. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांच्यात आपआपसात लढाया होऊन ते वेगवेगळे झाले. त्यांची वेगळी राज्ये होऊन एक दुसऱ्यावर सत्ता गाजवण्याचा प्रयत्न करू लागले. या अशा भांडणांमुळे मुसलमान राजांनी लाभ करून घेतला. त्यांनी हळूहळू चंदेलांचे राज्य जिंकले आणि काही भागावर आपली सत्ता स्थापन केली. चंदेलांच्या राज्याची शक्ती फार कमी झाली होती. ते आपली जुनी राजधानी खजुराहो सोडून कालिंजर किल्ल्यामध्ये येऊन राहिले आणि त्यालाच या छोट्याशा राज्याची राजधानी बनवून टाकली.

कीर्तिराय अशाच राज्याचे अधिकारी होते व राजकुमारी दुर्गावती त्यांची एकुलती एक लाडकी मुलगी होती. ती रूपाने, गुणाने आणि शौर्याने अनुपमेय होती. कीर्तिरायांना एकही मुलगा नव्हता तरीसुद्धा ते दुःखी नव्हते. त्यांना पूर्ण विश्वास होता की त्यांची लाडकी राजकुमारी दुर्गावती

कोणत्याही राजपुत्रापेक्षा कमी नव्हती. ती राजपूत राजावर आपल्या शौर्याचा कळसच चढवणारी होती.

कालिंजरचे राजगुरु फार मोटे विद्वान पुरुष होते. त्यांना राजनीतीचे डावपेचसुद्धा चांगल्या तऱ्हेने समजत होते. आणि वेळोवेळी कीर्तिरायना याबाबतीत ते सल्ला देत असत. कीर्तिराय पण त्यांच्या शब्दाला मान देऊन त्यांचा योग्य तोच आदर करीत व मान ठेवत असत. आणि त्याप्रमाणे राज्यकारभार करीत असत. इतकेच नाही तर राजगुरु पराक्रमी आणि धाडसी होते. ते सर्व तऱ्हेच्या शस्त्रविद्येत पारंगत होते. त्यांनी अनेक वेळा राजाबरोबर लढाईत भाग घेऊन आपल्या पराक्रमाने शत्रूला पळवून लावले होते. राजकुमारी दुर्गावतीला त्यांच्या देखरेखीखालीच शिक्षण मिळाले होते. इतिहासाचे शिक्षण देताना राजगुरूंनी दुर्गावतीला इतिहासातील खालील गोष्ट सांगितली—

'राजकुमारी, जेव्हा सिकंदरने पोरसचा पराभव केला तेव्हा त्याला वाटले की आता सर्व भारतावर आपले आधिपत्य झाले आहे. त्याला आपल्या शौर्याचा फार गर्व झाला आणि म्हणूनच तो भारतवासी लोकांना भित्रे आणि दुबळे समजू लागला आणि ह्या घमेंडीमध्ये त्याने एके दिवशी आपल्या दरबारात म्हटले की, अजूनपर्यंत तरी मला या हिंदुस्थानात असा एकही शूर वीर भेटला नाही, की जो मला क्षणभर तरी भिववून सोडील. येथील सरदार आणि सैनिकांमध्ये पराक्रम बिलकूल नाही. सर्व भित्रे आहेत आणि खोटाच रुबाब दाखवतात.

'दरबारात बसलेल्या राजांना आणि सरदारांना हे सिकंदरचे बोल ऐकून फार वाईट वाटले. परंतु ते मूग गिळून गप्प बसले! कारण त्यांचा पराभव झाला होता. व दास्यत्व पत्करल्यावर असे शब्दांचे वर्मी घाव बसत असतानाही ते सहन करण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. गुलामीची जिंदगी म्हणजे अपमान—अवहेलनाचे असह्य

जीवन होय. राजकुमारी, हे जीवन कसले ? असे जीवन जगण्यापेक्षा मरण बरे.' निराशेने राजगुरु म्हणाले. 'असो, दरबार संपल्यावर सर्व लोक आपआपल्या घरी गेले, परंतु भारतीय शूरविरांच्याबद्दल सिकंदरचे हे अपमानास्पद शब्द एकमेकांच्या तोंडून सगळीकडे हवेप्रमाणे पसरले गेले. जो कोणी ऐके तो रागाने बेभान होऊन जाई. परंतु सिकंदरचा पराभव करण्याचे सामर्थ्य कोणात होते ? कोणामध्येही तसे धाडस नव्हते आणि त्यांची आपसात एकी नसल्या कारणाने काही कारवाई करून त्याचा पराभव करण्याची शक्ती पण नव्हती.' सखेद आश्चर्याने राजगुरुकडे पाहात राजकुमारीने विचारले, 'काय ? कोणीही सिकंदरचा पराभव करू शकले नाही ? '

राजगुरु हसून म्हणाले, 'का नाही ? आमच्या देशात कधी तरी पराक्रमी वीराची वाण पडली आहे का ? हा सर्व परिणाम आप-आपसातील भांडणाचा आहे. म्हणूनच आज येथे मुसलमानांचे राज्य आहे. तसे पाहिले तर भारतवर्ष नेहमीच शूर-वीर, विद्वान आणि संत, महात्म्यांचा देश आहे. दुनियेमधील कोणताही देश ह्याची बरोबरी करू शकणार नाही; असा हा एकच देश आहे, की तो सर्व जगाशी बंधुत्वाचे नाते ठेवून त्यांना सुसंस्कृतीचे पाठ देऊन शिकवत असतो. अशा.... '

राजकुमारीने मध्येच त्यांना थांबवले व म्हणाली, ' गुरुजी हीच तर मोठी चूक झाली. आमच्या देशातील शूर योद्ध्यांनी जर परकीयांवर आपला अधिकार गाजवला असता तर आज आम्ही कोणाचे दास झालो नसतो.' तिच्या स्वरात कटूता व दुःख भरलेले होते. राजकुमारीच्या उत्तराने राजगुरु मनातल्या मनात फार आनंदीत झाले. आणि पुढे सांगू लागले, 'त्या वेळीतक्षशिला विश्वविद्यालयाचे आचार्य चाणक्य यांच्या प्रेरणेने चंद्रगुप्त मौर्य भारताची एकी घडवून आणण्याचा प्रयत्न करत होते. आचार्य

चाणक्यांनी त्यांना सांगितले होते की, ‘ जोपर्यंत सर्व देश एका झेंड्याखाली येऊन विदेशियांच्या विरुद्ध लढत नाही तोपर्यंत या देशातून परकीयांचे उच्चाटन होऊ शकणार नाही. चंद्रगुप्ताने ह्या शिकवणींची मनात खूण-गाठ बांधली होती. आणि त्या प्रयत्नास ते तन, मन, धन सर्वस्वाने लागले होते. चंद्रगुप्त फार सुंदर होते व शरीराने बळकट, सुदृढ होते. तसेच ते फार धाडसी आणि पराक्रमाने अजोड असे होते. त्यांच्या कानावर सिकंदरची बातमी आली होती. आणि त्यामुळे मनातून ते फार क्रुद्ध झाले होते. त्यांच्या नसानसातून त्यांचे गरम रक्त सळसळत होते. त्यांनी मनोमन प्रतिज्ञा केली की या अपमानाचा सूड मी जरूर घेईन. खूप दिवस ते विचार करत होते. नंतर मग त्यांना एक युक्ती सुचली. एका रात्री अगदी स्वच्छ चांदणे पडले होते. त्यांनी युनानी कपडे घातले आणि निर्भय होऊन युनानी सेनेच्या छावणीकडे निघाले. छावणीच्या चारी बाजूने सैनिकांचा कडक पहारा होता. परंतु जे शब्द उच्चारले असता आत प्रवेश मिळतो ( परवलीचे शब्द ) त्यांचा शोध चंद्रगुप्तने अगोदरच केला होता. म्हणून तेच शब्द बोलून ते आत घुसले. कोणत्याही युनानी सैनिकाला त्यांचा संशय आला नाही. इतकेच नव्हे तर सिकंदरच्या राहुटीभोवती जे रक्षक शिपाई पहारा देत होते त्यांना पण त्यांनी चकवले होते.’

राजकुमारीने आश्चर्याने राजगुरूंकडे पाहात विचारले, ‘ ते कसं काय ? ’

राजगुरूंनी सांगितले, ‘ पहिल्याने जे शब्द उच्चारून छावणीत प्रवेश मिळवला होता, तेच शब्द पुन्हा उच्चारून सिकंदरच्या तंबूत त्यांनी प्रवेश केला. सिकंदर झोपला होता. परंतु असे म्हणतात, की पराक्रमी योद्ध्यांची झोप कुत्र्याच्या झोपेसारखी सावध असते; थोडीशी चाहुल लागली तरी एकदम उडते. त्याचप्रमाणे चंद्रगुप्ताच्या येण्याने सिकंदरची झोप उडाली व तो उठून बसला. तोपर्यंत चंद्रगुप्ताने आपली तलवार काढून त्याच्या छातीवर लावली आणि त्याला पुन्हा जबरदस्तीने झोपण्यास लावले.’

राजकुमारी आनंदाने टाळ्या वाजवून नाचू लागली. आणि म्हणाली, 'खूप बहाददर ! कमाल केली. केवढे हे धाडस आणि समयसूचकता !'

'अशा कार्यात फार सावध असावे लागते. नुसती शौर्याने व शक्तीने कामे होत नाहीत. तर त्यात योजकता व युक्ती या गुणांची पण जरुरी आहे. नंतर चंद्रगुप्ताने सिकंदरला विचारले, आता तरी तुला विश्वास येतो ना ? भारतात सुद्धा असे वीरपुरुष आहेत की ज्याच्या सुरक्षिततेचा संपूर्ण बंदोबस्त असतानासुद्धा त्याच्या तंबूत प्रवेश करून त्याच्या जीवनाचा शेवट करू शकतात. तुझ्या गर्वांध मनातील सर्व बेत धुळीस मिळवून टाकीन. एवढे बोलेपर्यंत सिकंदर मुकाट्याने पडून राहिला होता. त्याच्या आयुष्यात पहिल्यानेच हा त्याचा अपमान झाला होता. चंद्र-गुप्ताने तलवार काढून घेतली व सिकंदरला म्हणाला, माणसाने एवढा गर्व करू नये. गर्वाचे घर नेहमीच खाली असते. हिंदुस्तानी लोक निशस्त्रावर कधी हल्ला करत नाहीत. असे म्हणत झटक्यात बाहेर पडले.'

राजकुमारी उदास झाली. ती दुःखद स्वगत म्हणाली, 'अशी इतकी सुंदर संधी मिळाली असताना त्यांनी तिचा उपयोग केला नाही. त्यावेळीच त्यांनी जर सिकंदरास मारले असते तर आज आमच्या देशाचा इतिहास बदलला असता. चंद्रगुप्ताने दूरदृष्टीने व विचारपूर्वक हे काम केले नाही.' राजगुरु राजकुमारीकडे निरखून पाहू लागले. थोड्या वेळाने ते म्हणाले, 'राजकुमारी, शत्रूचा गोटात रात्री चोरून घुसून त्याचा वध करणे हे कोणत्याही वीरपुरुषाला शोभत नाही. हा अधर्म आहे. राजकुमारी ! असे कधीही होणार नाही.'

'परंतु हा जर अधर्म समजला जातो तर भगवान् कृष्णाने प्रतिज्ञा केल्या-नंतर सुद्धा कौरव-पांडव युद्धात हातात शस्त्र का घेतले ?' राजकुमारीने प्रश्न केला 'त्यांनीपण आपल्या प्रतिज्ञेचे पालन करावयास पाहिजे होते. त्यांच्या परा-क्रमाला हा एक कलंक लागला. ह्याला अधर्म का नाही म्हणावयाचे ?' तिचे

न्यायपूर्ण उत्तर ऐकून राजगुरु खूप झाले. परंतु तसे न दाखवता ते म्हणाले, 'खरोखर हा अधर्मच आहे. जर त्यांनी युद्धाच्या मैदानात शस्त्र न उचलण्याची प्रतिज्ञा केली होती तर त्यांनी हाती शस्त्र घेऊन लढण्यास तयार व्हावे हे खरंच अनुचित आहे. अधर्म पण आहे.'

'परंतु भगवान कृष्ण तर त्याला अधर्म म्हणत नाहीत.' राजकुमारी आश्चर्याने म्हणाली. त्यांच्या मनाप्रमाणे राजनीतीत सर्व काही करण्याची मोकळीक आहे. ते पुन्हा पुन्हा सांगत आहेत की शत्रूचा कसाही पराभव करून त्याला आपल्या स्वाधीन कर. जेथे खोटे बोलावे लागेल तेथे खोटे बोल. आणि जेथे छळ-कपट करण्याची जरुरी आहे तेथे ते करून तू यश मिळव. शत्रूवर दया करणे किंवा क्षमा करणे राजनीतीच्या नियमाच्या विरुद्ध आहे. मीसुद्धा असेच समजते. ही भगवान श्रीकृष्णाची नीती बरोबर आहे. राजनीतीमध्ये धर्म--अधर्माचे माप, दंड बदलत असतात. आणि आमच्या पूर्वजांनी या नीतीची मदत घेतली असती तर आज अशी आपली स्थिती झाली नसती.'

'राजकुमारी ! मी तर हेच तुझ्याकडून ऐकण्याची अपेक्षा करत होतो.' राजगुरु प्रसन्नपणे म्हणाले. 'शत्रूच्या बरोबर याच नीतीने वागले पाहिजे. चंद्रगुप्ताने फार मोठी चूक केली होती. त्यांनी अत्याचारी सिकंदरचा वध करून आपल्या मार्गातील काटा काढून टाकावयास पाहिजे होता.' बराच वेळ दोघेही विचार करीत स्वस्थ बसले होते. नंतर राजगुरु बोलले, 'आज सम्राट अकबरसुद्धा दिवसेंदिवस अधिक शक्तिशाली होत आहे. भगवान सर्वश्रेष्ट आहे. आता तू जा. तुझ्याकडून खूप मोटे कार्य होण्याची मी अपेक्षा करीत आहे राजकुमारी !' राजकुमारी गुरुजींना वंदन करून आपल्या महालात गेली.

## तीन

आत्ताचा मध्य प्रदेशाचा उत्तरी भाग त्या दिवसात गोंडवाना राज्याचा अन्तर्गत भाग होता. पूर्वेकडून रतनपूरपासून, पश्चिमेकडून रैसीनापर्यंत त्याचप्रमाणे उत्तरेकडे रींवापासून दक्षिण भारताच्या सीमेपर्यंत गोंडवाना राज्याचा विस्तार होता. त्याची राजधानी गढमंडल होती. तेथील राजा दलपतीशाह फार पराक्रमी आणि उदार होता. त्याच्या शूरपणाची इतकी ख्याती पसरली होती की, गढमंडल मुगल सम्राट अकबरच्या मनात काट्याप्रमाणे सलत होते. तरीसुद्धा त्याच्यावर स्वारी करण्याचे अकबरचे धाडस होत नव्हते. अकबरला भीती वाटत होती. कदाचित दलपतिशाहा-कडून जर आपला पराजय झाला तर राज्यामध्ये तोंड दाखवण्याची त्याला लाज वाटत होती. आणि मग असे जीवन शूर वीरास असह्य होते. तेव्हा तो योग्य संधी येण्याची वाट पाहात बसला व दुसरीकडे आपली शक्ती वाढवत राहिला.

दलपतिशाहच्या पराक्रमाची आणि गुणांची कीर्ती राजकुमारी दुर्गावतीच्यासुद्धा कानावर गेली होती. ती शूर बाला होती आणि शूर असलेल्या पुरुषासच ती आपला पती म्हणून निवडणार होती. तिच्या हृदयात दलपतिशाहबद्दल प्रेम होते.

तिकडे दलपतिशाहनेदेखील राजकुमारीच्या रूप-गुणाची ख्याती ऐकली होती. राजकुमारीशी विवाह करण्यास तो उत्सुक होता. त्याला आपले गुप्त हेर पाठवून सर्व माहिती काढणे फार जरुरीचे वाटले. लगेच त्याने एक पुरुष आणि एका स्त्रीला कालिंजरला पाठवून दिले. जवळजवळ दोन महिन्यानंतर ते दोघेही गढमंडलला परत आले.

दलपतिशाहने मोठ्या उत्सुकतेने त्यांना हकीगत विचारली.

महिला म्हणाली, ' महाराज जे ऐकले त्याच्यापेक्षा राजकुमारी जास्त सुंदर व गुणवान आहे. महाराज तिच्याबद्दल सांगावे तेवढे थोडेच आहे. ती जितकी सुंदर आहे, त्याहून अधिक म्हणजे देवाने तिला बुद्धी व धाडस दिले आहे. ती बोलत असताना तर असे वाटते की फुले पडत आहेत. स्वभावानेदेखील ती फार प्रेमळ व गोड आहे. कठोर हृदयाचा मनुष्य-सुद्धा तिच्या स्वभावाने द्रवेल ! महाराज ! ती जर गढमंडळची राणी झाली, तर सोन्याला सुगंध येईल.'

दलपतिशाहने पुरुषाकडे वळून विचारले, ' खरेच का राजकुमारी दुर्गावती वाघाची व चित्याची शिकार समोरासमोर लढून तलवारीने करते ? '

' हे खरे आहे. महाराज ! शौर्यामध्ये ती तर बिलकुल दुर्गादेवीचा अवतार आहे. आणि युद्धाला जी नीतीशास्त्रे लागतात, त्यांत ती अगदी तरबेज आहे. अशा सर्व कलांनी युक्त असलेली स्त्री क्वचितच पाहा-वयास मिळते. आम्ही स्वतः आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे, राजकुमारी सर्व दृष्टीने महाराजास अगदी योग्य अशीच आहे. खरोखरच आपला दोघांचा विवाह झाला तर सोन्याला सुवास येईल ! ' पुरुषाने उत्तर दिले.

दलपतिशाह हसले आणि उठले. तोच ती स्त्री म्हणाली, ' महाराजांना पण आश्चर्य वाटेल की राजकुमारीने मनानेच महाराजांना आपला पती मानले आहे. ती विवाह करणार तर आपल्याशीच करणार आहे. अन्य कोणाही पुरुषाशी ती विवाह करणार नाही. '

दलपतिशाहला फार आनंद झाला. ते म्हणाले, ' खरंच ! असे जर असेल तर मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. पण खरंच का ती स्वतः असे म्हणाली ? '

' होय महाराज ! तिचे आपल्याविषयीचे गाढ प्रेम पाहून शेवटी मीच आपलाही हेतु सांगितला. तेव्हा तीच आपण होऊन म्हणाली, ' मग तर हा फार चांगला योग जुळून आला आहे. ' आता इतर कोणाला

ती पती म्हणून आपल्या हृदयात स्थान देणार नाही.' दलपतिशाह आपल्या विचारात दंग होऊन आपल्या महालात गेले.

तीन चार दिवसांनी दलपतिशाहने आपला मंत्री अधारसिंह आणि राजगुरू यांना विवाहाची मागणी करण्यासाठी कालिंजरला पाठवून दिले. कालिंजरला पाहुण्यांचे अगत्यपूर्वक स्वागत झाले. दुसऱ्या दिवशीच त्यांना दरबारात कीर्तिरायच्या समोर आणले. तेव्हा राजाने त्यांना येण्याचे कारण विचारले.

अधारसिंहने उभे राहून, 'मी राजकुमारी दुर्गादेवीस गोंडवानचे राजे महाराज दलपतिशाह यांच्याकरिता विवाहाची मागणी घालण्यास आलो आहे. आमच्या महाराजांनी आपली कन्या राजकुमारीचीच निवड पत्नीपदासाठी केली आहे. म्हणून कोणत्याही बाकी गोष्टींकडे त्यांनी लक्ष दिले नाही व तिला मागणी घालण्याकरिता आम्हास आपल्याकडे पाठवले आहे. राजकुमारीच गोंडवानाची महाराणी होण्यास सर्वथा योग्य आहे.'

कीर्तिरायचा चेहरा गंभीर झाला आणि ते काहीशा कठोर व दुःखीत स्वराने म्हणाले, 'ते तर ठीकच आहे. परंतु महाराजांनी एक गोष्ट विचारात नाही घेतली!'

अधारसिंह नम्रतापूर्वक म्हणाले, 'अशी कोणती गोष्ट आहे महाराज?'

कीर्तिराय स्पष्टपणे बोलले, 'वंशवेलीच्या अनुसारे हे बरोबर वाटत नाही. कारण ते खालच्या श्रेणीतले क्षत्रिय आहेत. आम्ही आमची कन्या त्यांना कशी देणार? कुळाची परंपरा व मर्यादा सांभाळावी लागतेच. आपण आमच्या चंदेलामध्ये कधी तरी असा विवाह झालेला पाहिला आहे का?'

अधारसिंहाला कीर्तिरायांचे बोलणे जरासुद्धा आवडले नाही. त्याच्या मनाला ते बोलणे खटकलेच. तरी त्याने नम्र स्वरात सांगितले, 'महाराजांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु मला वाटते, विवाहात गुण आणि योग्यता हीच अधिक महत्त्वाची आहेत. दुर्गावती सारख्या शूर व

सर्व गुणांनी युक्त असलेल्या राजकुमारीला तसाच पराक्रमी आणि सद्गुणी पती पाहिजे.'

कीर्तिराय म्हणाले, 'यात काय संशय आहे? मी ही गोष्ट कधीच नाकारीत नाही. पण कुळाची प्रतिष्ठाही कधीच विसरू शकत नाही व ती बंधने तोडू शकत नाही. राजकुमारीचा विवाह मी आपल्यापेक्षा कमी असलेल्या कुळाबरोबर कसा करणार? ही गोष्ट अपमानकारक आहे.'

'महाराज, आम्ही हिंदू लोकांनी या मान-अपमानाच्या भोवऱ्यात अडकून आपला नाश करून घेतला आहे. आपण आपसातच लढून शक्तिहीन झालो आहोत. नाही तर आमच्या देशावर मुसलमान राजांनी कधीतरी सत्ता गाजवली असती का? आणि आमची अशी स्थिती झाली असती का?' अधारसिंहने राजनीतीचा आधार घेतला. 'आपण पाहातच आहात की कशा प्रकारे सम्राट अकबर आपल्या हुशारीने आमच्या संस्कृतीची पाळेमुळे नाहीशी करण्याची इच्छा करत आहे. आपल्यात फूट पाडून एकेकाला धरून सर्व हिंदूराज्यांना शक्तिहीन करत आहे. त्याला फार भीती वाटत आहे, की सगळे हिंदु राजे एक होऊन एकत्रित हल्ला करून आपणास हिंदुस्थानाबाहेर हाकलून लावतील. म्हणून तो कोणी ना घरचा ना दारचा असे समजून फार सावधगिरीने पावले टाकत आहे. त्याचा.

कीर्तिराय मध्येच म्हणाले, 'अधारसिंह, हे काही खरं नाही. वेळ कधीही एक सारखी नसते. एके काळी आमची सत्ता होती. आता मुसल-मानांची आहे. याकरिता काय केले पाहिजे? हे मात्र खरे आहे की आपला धर्म-कर्तव्य मान-मर्यादांचे रक्षण होणे जरुरी आहे. ते आम्ही करू शकतो. परंतु आम्ही दलपतिशाहच्या बरोबर आमच्या कन्येचा विवाह करून आपल्या पूर्वजांच्या नावाला कलंक नाही लावू शकत.'

अधारसिंहाला समजून चुकले की कीर्तिराय विवाह करण्यास तयार नरा.

अनुक्रम
क्रमांक ३४९८

नाहीत. तथापी तो प्रयत्नाची शिकस्त करत होता. तो म्हणाला, 'महाराज, आपणास ही परंपरा राजकुमारीपेक्षा का जास्त प्रिय आहे? राजकुमारीचे जीवन किती सुखावह व आनंदाने जाईल, याचा विचार आपण का करत नाही?' कीर्तिराय जरा रागानेच म्हणाले, 'अधारसिंह मला तुमचा उपदेश नको आहे. मला माझ्या मुलीच्या सुख-दुःखाची काळजी आहे. दलपतिशाह किती चलाख आहेत हे मला पूर्णपणे माहीत आहे. ते माझा अपमान करू इच्छितात परंतु तुम्ही त्यांना सांगा की मी तुमच्या दडपणाला भिणार नाही किंवा शक्तीहीन पण नाही. आता तुम्ही जाऊ शकता.'

नाइलाजाने अधारसिंह जाऊ लागले. तरीसुद्धा पुन्हा त्यांनी सांगितले, 'महाराज आपण जो निर्णय घेतला आहे, तो कदापि बरोबर नाही. हे राजपूतांचे दुर्भाग्य आहे. आमच्या महाराजांनी मित्रत्वाचा हात पुढे केला आहे. शत्रुत्वाचा नाही. मी जाता जाता पुन्हा एकदा विनंती करतो की आपण या गोष्टींचा फेरविचार करावा.' नम्रतापूर्वक मस्तक वाकवून नमस्कार करून अधारसिंह राजगुरूच्या बरोबर दरबारातून बाहेर आला.

राजकुमारीला समजले की दलपतिशाहकडून आपल्याला मागणी आली होती, ती वडिलांनी धुडकावून लावली. हे समजल्यावर तिला फार वाईट वाटले. तिची सर्व स्वप्ने धुळीस मिळाली. तिने पहिल्यापासूनच दलपतिशाहला आपल्या हृदयात पतीचे स्थान दिले होते. त्यामुळे तिची दुसऱ्या कोणाशी लग्न करण्याची इच्छा नव्हती. तर इकडे वडिलांच्या अब्रूला कलंक पण लावू इच्छित नव्हती. तिला काही सुचत नव्हते. म्हणून तिने मौन राहण्याचे ठरवले.

## चार

**अधारसिंहने** गढमंडळला परतल्यावर दलपतिशाहला सर्व गोष्टी सांगितल्या. ते ऐकून राजाला फार वाईट वाटले. व रागही आला. कीर्तिरायने त्याला कमी प्रतीचा क्षत्रिय म्हणून केलेल्या उल्लेखाने त्याचा मानभंग झाला. तरी तो या गोष्टीवर कित्येक दिवस विचार करत होता.

दलपतिशाह दुर्गावतीकडे फार आकर्षित झाले होते. त्यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये दुर्गावती बरोबर विवाह करावयाचा होता. परंतु राजकुमारीला मिळवावयाचा एकच उपाय होता. आणि तो म्हणजे कीर्तिरायशी युद्ध करून त्याला पराजित करणे. दलपतिशाहने युद्ध करण्याचा निश्चय केला. त्याने अधारसिंहाचा सल्ला घेतला. व त्यानेही या गोष्टीस संमती दिली. दुर्गावतीला गढमंडळची राणी बनवण्याचा हाच एक मार्ग होता.

युद्धाचा निश्चय झाल्यावर दलपतीशाहने कीर्तिरायला पत्र लिहिले, की ते जर आपल्या कन्येचा विवाह माझ्याबरोबर करून देत नसतील तर, नाईलाजाने कालिंजरवर हल्ला करावा लागेल.

पत्राचे उत्तर लवकरच आले. कीर्तीरायने दलपतिशाहचे लढाईचे आव्हान स्वीकारले होते व त्याप्रमाणे ते तयारीस लागले. दलपतिशाहने पण आपल्या सैन्यास सज्ज राहण्याचा हुकूम दिला. आणि मोठ्या स्फूर्तीने कालिंजरला निघाले. कालिंजरपासूनच थोड्या अंतरावर त्यांनी आपला सैन्याचा तळ ठोकला व दोन्ही बाजूने युद्धाला तोंड केव्हा लागते ह्याची वाट पाहू लागले.

तिकडे कीर्तिरायने पण तयारी केली होती व दलपतिशाहचा गर्व उतरण्याची शपथ घेतली होती. दलपतिशाहने पहिल्यांदा हल्ला करावा

असे कीर्तिरायना वाटत होते. तर इकडे दलपतिशाहना वाटत होते की कीर्तिरायने पहिल्याने हल्ला करावा. तथापी असे दोघांना वाटत होते तरी प्रथम हल्ला दलपतिशहाकडून व्हावयास पाहिजे होता. पण त्यांनी हल्ला न करण्याचे एक कारण होते. युद्ध होण्याच्या पहिले कसेही करून एक वेळ भेटून राजकुमारीला काही गोष्टी सांगावयाच्या होत्या. त्यांना भीती वाटत होती की कीर्तिरायांचा जर पराभव झाला तर ते दुर्गावतीला मारून टाकतील म्हणून दलपतिशाह शेतकऱ्याचा वेष करून दररोज रात्री गुपचूप तंबूतून निघून जात आणि राजकुमारीची व त्यांची भेट व्हावी म्हणून काहीतरी उपाय शोधत तिच्या महालाभोवती फिरत असत. तिकडे राजकुमारीची चिंता वाढली होती. तिच्याकरिता दलपतिशाह येथपर्यंत येऊ शकतील ह्याची तिने स्वप्नामध्येही कल्पना केली नव्हती. युद्धात कोण जिंकणार आणि कोण हरणार हे कोणालाच माहिती नव्हते. दलपतिशाहचा पराभव झाला तर तिच्या हृदयाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या असत्या, सर्वस्व लुटले गेले असते आणि वडिलांच्या पराभवाने कुलाची प्रतिष्ठा भंग झाली असती. दोन्ही बाजूंनी तिच्या पुढे मोठा विकट प्रश्न उभा होता. इकडे आड, तिकडे विहीर अशा कात्रीत ती सापडली होती. तिचे मन फार बेचैन झाले व तिला काय करावे हे समजत नव्हते, तिला कोणाचाच पराभव होऊ नये असे वाटत होते. परंतु युद्ध म्हणजे एकाचा जय, दुसऱ्याचा पराभव आहेच. शिवाय रक्तपातही होणारच. राजकुमारीचे दोन्ही बाजूंनी मरण होते. शेवटी तिने या बेचैन मनःस्थितीतून सुटका करण्यासाठी आत्मघात करण्याचे ठरवले. या संकटास आपणच कारणीभूत आहोत, आपणच आत्मघात करून घ्यावा म्हणजे सर्व अनर्थ टळेल. असा तिने विचार केला. तिने आपली कट्यार काढली आणि छातीमध्ये भोसकून ती आपल्या जीवनाचा शेवट करणार, तोच एकदम तिच्या मनात एक विचार आला की ज्याला आपण आपल्या जीवनाचे सर्वस्व

मानले आहे त्याचे एक वेळ तरी दर्शन घ्यावे. या विचाराने तिचा हात एकदम थांबला. तिच्या मनात जो विचार आला होता, तो अगदी बरोबर होता. दलपतिशाहला भेटण्यास ती फार आतुर होती. पण महाराज कोठे व कसे भेटणार ? ह्याचा विचार करत असतानाच तिला एक युक्ती सुचली.

कालिंजर किल्ल्याच्या खाली कीर्तिरायची सर्व सेना दलपतिशाहच्या सैन्याशी लढण्यासाठी समोरा समोर उभी होती. कीर्तिराय दररोज सकाळ-संध्याकाळ सैन्याची पाहणी करून त्यांना उत्तेजन देत असत. आज दुर्गावतीसुद्धा त्यांचेबरोबर सैन्याची पाहणी करण्याकरिता निघाली. म्हणून कीर्तिरायना फार आनंद झाला. ते दोघेही घोड्यावर बसून बराच वेळ सैन्याची पाहणी करीत होते. परत येते वेळी तिने वडिलांना विचारले की, 'आपल्याला गढमंडळच्या सैन्याबद्दल काही माहिती आहे का ?'

कीर्तिरायने विचारले, 'कसली माहिती मुली ?'

'बाबा, मला वाटते की, त्यांचे सैन्य किती आहे ? त्यांची लढण्याची पद्धत व तयारी कितपत आहे ? शिवाय अजून त्यांनी आक्रमण का केले नाही वगैरे माहिती गुप्तहेर पाठवून करून घेतली तर आपण चांगल्या तऱ्हेने लढून विजय निश्चितच मिळवू.' कीर्तिरायला दुर्गावतीची ही कल्पना पसंत आली. आतापर्यंत त्यांना ही युक्ती सुचली नव्हती. ते म्हणाले, 'दुर्गा तू दिलेला सल्ला फार चांगला आहे. परंतु हे काम अवघड आहे व त्याकरिता हुषार आणि विश्वासू माणूस पाहिजे.'

राजकुमारीने आणखीनच गंभीर होऊन म्हटले, 'तुमचे म्हणणे बरोबर आहे बाबा ! नाही तर उलटेच व्हायचे, ती व्यक्ती पकडली जायची आणि तिने सर्व गुप्त भेद सांगून टाकला की मग सगळेच बेत फसायचे !'

'होय, प्राणाचे भय सर्वांनाच असते.' कीर्तिराय थोडा वेळ विचार करून म्हणाले– 'हे काम होणे कठीण आहे. या वेळी कोणावर विश्वास



ठेवून काम सोपवणे शहाणपणाचे होणार नाही. असे काही करणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेणे आहे.'

राजकुमारी लगेच म्हणाली, 'पण मी जर हे काम करण्याचा निश्चय केला तर तुम्ही परवानगी द्याल का?'

कीर्तिरायने मान हलवून म्हटले, 'कधीच नाही. हे काम तुझ्याकडून करवून घेण्यापेक्षा मी करू शकणार नाही का?'

'आपण कसं करू शकणार?' राजकुमारी आश्चर्याने म्हणाली. 'आपल्याला सर्वजण ओळखतात. आपणास गुप्त रीतीने संचार करता येणार नाही. आणि मी....'

कीर्तिराय मध्येच तिला थांबवत म्हणाले, 'ते काही असो, परंतु हे काम तुझे नाही. तसे पाहिले तर दलपतिशाहपेक्षा मी कमी सामर्थ्यशाली नाही. तो ज्या गर्वाने येथे आला आहे, तो त्याचा गर्व मी उतरून टाकणार आहे. त्याने चंदोलांच्या बरोबर कधी लढाई केली नाही म्हणूनच त्याला मी चांगला धडा शिकवणार आहे. असा काही दणका देईन की भविष्यात पुन्हा तो डोके वर करणार नाही. तू काही काळजी करू नकोस.' राजकुमारीचा नाईलाज झाला. तिने दलपतिशाहचे दर्शन घेण्यासाठी युक्ती योजली होती, ती अशा प्रकारे असफल झालेली पाहून ती चूप बसली. किल्ल्याचे दार जवळ आले आणि ते दोघेही किल्ल्यात दाखल झाले.

रात्रभर राजकुमारी पलंगावर तळमळत होती. तिला काही सुचत नव्हते. तथापी तिला दलपतिशाहला भेटण्याची इच्छा होती. शेवटी तिने रात्री पुरुषाचा वेष घेऊन दलपतिशाहच्या छावणीजवळ जाण्याचा निश्चय केला, तेव्हा कोठे तिच्या मनाला शांतता लाभली. दुसरे दिवशी सूर्य मावळला. दिवेलावणी झाली. तेव्हा राजकुमारी सगळ्यांच्या नजरा चुकवून कालिंजर किल्ल्याच्या बाहेर पडली. तिने नोकरासारखा पुरुष वेष केला होता म्हणून किल्ल्याच्या बाहेर आल्यावर तिला कोणी ओळखले नाही. ती भरभर चालत होती. गोंडवानी सैन्याच्या छावणीजवळ आल्यावर तिची पावले आणखीनच भरभर पडू लागली. तोपर्यंत सगळीकडे चांदणे कसे अगदी स्वच्छ पडले होते. थंड वारे वाहात होते. कालिंजर व त्याच्या सभोवतीचा प्रदेश चांदण्यात न्हाऊन निघत होता. फार सुंदर दृश्य होते. छावणी जशी जवळ येत गेली तशी तिच्या छातीची धडधड वाढू लागली. कसं काय त्या विभूतीचे दर्शन आपणास घडणार, याची तिला काळजी लागली होती. तोच एकदम कोणी तरी समोरून येताना दिसले. तिला आश्चर्य वाटले. कारण की हा रस्ता अगदी निर्जन होता आणि या वेळी इकडून कोणाचेही येणे जाणे अशक्य होते. पण आता काहीही होऊ दे.

उखळीमध्ये डोके घातले आहेच तेव्हा मुसळाची भीती आता कशाला धरावयाची? असा विचार करून ती पुढे पुढे जाऊ लागली. तिकडून येणारा माणूस तिच्या जवळ येऊन थोडा थांबला. त्याने राजकुमारीस नीट पाहिले आणि पुन्हा चालू लागला. राजकुमारी पण चालतच होती. तिचे भय हळूहळू कमी होत चालले. तो एक शेतकरी होता. मग राजकुमारीने थोडा विचार केला आणि थांबून मागे वळून तिने जोरात हाक मारली.

'ओ जाऊजू! ओ जाऊजू!'

शेतकरी थांबला व त्याने विचारले, 'काय आहे रे?'

'माझे बोलणे जरा ऐकशील का?'

'काय तुझे ऐकू बाबा?'

राजकुमारी हळूच त्याला म्हणाली, 'बाबा आपण पडावच्या बाजूने आलात काय?.'

'का रे? तुला कशाला हवी माहिती?'

राजकुमारी आपला पोषाख नीट सावरून म्हणाली, 'मी इकडून जाऊ शकते काय? मला कोणी अडवणार तर नाही ना?'

'का तू राजाच्या सेनेमध्ये काम करत नाहीस?'

'नाही.'

शेतकऱ्याने डोळे मिचकावीत म्हटले. 'नाही.'

'अच्छा! कोठे जावयाचे आहे तुम्हाला?'

'मला तर छावणीमध्ये जावयाचे आहे.' राजकुमारीने उत्तर दिले.

'छावणीमध्ये?' शेतकरी आपल्याशीच कुजबुजला.

'हा, बाबा!'

'का? काही जरूरी काम आहे वाटते?'

'राजाला भेटावयाचे आहे.' राजकुमारी धीटपणाने म्हणाली. शेतकरी राजकुमारीच्या जवळ येऊन म्हणाला—'राजाला भेटावयाचे आहे? आणि ते अशा वेळी? कोठचे राहणारे आहात?'

'कालिंजरचे राहणारे !' राजकुमारीने एक दीर्घ श्वास घेतला.

'कालिंजरचे राहणारे ! आणि गढमंडळच्या राजास भेटण्यास चालला आहात !' शेतकरी थट्टेच्या स्वरात म्हणाला. 'हे किती विचित्र वाटते. जे काही सांगावयाचे ते राजा कीर्तिरायला का नाही सांगत ? तेथे जाण्याचे काय कारण ?' राजकुमारी शेतकऱ्याच्या उलट सुलट प्रश्नाने चिडून गेली होती. तरी पुन्हा म्हणाली, 'हो तसेच कारण आहे. गढमंडळच्या राजालाच सांगणे जरुरी आहे. बरे, तुम्ही जा.'

राजकुमारी वळून पुन्हा चालू लागली. तिने माहिती काढण्यासाठी खूप गोष्टी केल्या. परंतु माहिती काही मिळू शकली नाही. शेतकऱ्याने पुढे होऊन राजकुमारीचा हात पकडून म्हणाला—'आता मी तुझ्याकडून सर्व गोष्टी ऐकल्याशिवाय तुला जाऊ देणार नाही. तुला सर्व सांगावेच लागेल. नाहीतर मी तुला पकडून महाराज कीर्तिरायांकडे घेऊन जाईन.' राजकुमारीने घाईने आपला हात सोडवून घेतला. आणि त्यास रागाने म्हणाली—'मी अशी मूर्ख नाही की, इतक्या सहजासहजी माझे गुप्त रहस्य सांगून टाकीन ! आपण माझ्याबद्दल चुकीचा गैरसमज करून घेऊ नका. मी गढमंडळच्या राजाशी सल्ला मसलत करण्यास जात आहे.' शेतकरी आश्चर्याने म्हणाला, 'तू काय त्याला सल्ला देणार ! आणि तो तुझे काय ऐकणार आहे ?'

'त्याला सांगणार की एका साधारण मुलीकरिता हजारो लोकांचे प्राण कशाला गमावतोस ? इतका रक्तपात त्या मुलीसाठी करण्यापेक्षा दुसऱ्या राजकुमारीशी तू विवाह नाही का करू शकत ! विनाकारण आपआपसात लढाया करून तुम्ही राजे आपली ताकद खर्ची घालता. यापासून फायदा तर काहीच नाही.' राजकुमारी आवेशाने बोलत होती व आपले म्हणणे पटविण्याचा प्रयत्न करीत होती.

शेतकरी विचारांच्या तंद्रीतच म्हणाला, 'तुझे म्हणणे अगदी बरोबर

आहे. पण त्यांना तुझे म्हणणे पटले पाहिजे ना ? तुला माहीत नाही का ? यामध्ये गढमंडळच्या राजाचा काही दोष नाही. त्याने पहिल्याने कीर्तिरायकडे राजकुमारीसाठी मागणी घातली होती. पण त्यांनी ती नाकारली.'

'नाकारतील नाही तर काय करतील ? वा रे वा ! ते आपल्यापेक्षा कमी दर्जाच्या जातीतल्या दलपतिशाहबरोबर आपल्या मुलीचे कसे लग्न लावून देतील ? आणि राजकुमारी पण ह्या गोष्टीस कदाचित तयार नसेल.' राजकुमारी आपल्या या बोलण्यावर स्वतःच खूष झाली होती.

शेतकरी हसला, 'तर तुला त्याबद्दल काहीच माहिती नाही. राजकुमारीने केव्हाच गढमंडळच्या राजास आपला मनोमन पती मानला आहे व तसा संदेश पण त्याच्याकडे पाठविला आहे.'

राजकुमारी आश्चर्याने शेतकऱ्याकडे पाहातच राहिली. तिला वाटले ही गोष्ट ह्याला कशी काय माहिती ? ती विचारात मग्न झाली. शेतकरी म्हणाला—'तुला माझ्या बोलण्याचे आश्चर्य वाटते आहे ना ?'

राजकुमारी स्वतःस सावरून म्हणाली,—'खरंच बाबा, ही गोष्ट तुला कशी माहिती झाली ? कालिंजरची राजकुमारी असा काही निरोप पाठवू शकणार नाही.'

'का पाठवू नाही शकणार ? तुला त्याबद्दल काय माहिती आहे ?' तावडतोब शेतकरी म्हणाला.

'मला सर्व काही चांगल्या प्रकारे माहिती आहे.' राजकुमारी आपल्या शब्दावर जोर देत म्हणाली. 'माझी बहीण राजकुमारी दुर्गादेवीच्या विश्वासातील दासी आहे. तिच्यापासून राजकुमारी कोणतीही गोष्ट लपवीत नाही. अशी काही बातमी असती तर माझ्या बहिणीला जरूर माहीत पडली असती.' राजकुमारीने शेतकऱ्याकडे संशयाने पाहात म्हटले. तिचा त्या हुशार शेतकऱ्याबद्दल संशय वाढत चालला होता.

शेतकऱ्याने निश्चयी स्वरात सांगितले, 'नक्कीच तुझ्या बहिणीपासून

ही गोष्ट राजकुमारीने लपवून ठेवली आहे. मी जे काही सांगतो त्यावर विश्वास ठेव. माझा एक नातेवाईक दलपतिशाहच्या अंगरक्षकांपैकी एक आहे. मला ही बातमी त्याचेकडून समजली आणि मला वाटते ही गोष्ट निश्चित खोटी नसावी.'

क्षणभर गप्प राहून तो राजकुमारीकडे प्रेमाने पाहात म्हणाला– 'इतकेच नव्हे तर, असे पण ऐकले आहे की दलपतिशाह राजकुमारीला भेटण्यासाठी फार उत्सुक आहेत व रात्री ते कालिंजरच्या सभोवती इकडून तिकडे हिंडत असतात. आणि त्यामुळेच त्यांनी अजून कालिंजरवर हल्ला केला नाही. ते एकदा राजकुमारीला भेटतील आणि मगच लढाईस खरं तोंड लागेल. किंवा जे त्यांना योग्य वाटेल तसे–'

राजकुमारी आश्चर्याने पाहातच होती व तिचा संशय वाढत होता. तिला वाटले मोठ्या विचित्र माणसाशी आपली भेट झाली आहे. तरीसुद्धा कोणताही भाव चेहऱ्यावर न दाखवता, ती म्हणाली–' आपल्याला तर खूपच गोष्टींची माहिती आहे. परंतु या गोष्टी जर खऱ्या असतील, तर मग गढमंडळच्या राजाकडे माझे जाणे योग्य नाही. यामध्ये राजकुमारीचीच चूक आहे.'

'ते काही असो. तुम्ही आपल्या बहिणीस पुन्हा सांगा की राजकुमारीच्या मनातील हेतू पडताळून पाहा. आणि तिला सांग की राजा तुला भेटण्यास फार आतूर झाला आहे. तेव्हा ती दोघे जर भेटली तर त्या भेटीतून काही तरी चांगलेच निघेल व तुमचा हेतूही सफल होईल.' शेतकरी म्हणाला.

राजकुमारीने क्षणभर विचार करून प्रश्न केला,

'राजा दलपतिशाह येथे राजकुमारीस भेटतील का ?'

शेतकरी खुषीने म्हणाला– 'हो! जरूर भेटण्यास येतील. जर राज-

कुमारी भेटण्यास येणार असेल तर मी पण आपल्या नातेवाईकाबरोबर राजाला भेटण्याचा निरोप देईन.'

थोडा वेळ राजकुमारी विचार करून म्हणाली, 'ठीक आहे. मी उद्या माझ्या बहिणीस हे सर्व सांगेन. तथापी राजकुमारी काही कारणाने येऊ शकली नाही तर माझी बहीण तिचा निरोप घेऊन येईल. आपण महाराजांना येथे घेऊन या. नंतर मग काही तरी मार्ग निघेलच.'

'ठीक आहे. आता मी जातो.' शेतकरी बळून निघणार इतक्यात राजकुमारी त्यास म्हणाली, 'परंतु लक्षात राहू द्या, की ही गोष्ट कोणाला कळता उपयोगी नाही. महाराज कीर्तिराय कशा स्वभावाचे आहेत हे तुम्हाला माहीतच आहे. नाही तर काही तरी भलतेच घडून येईल!'

शेतकरी हसून म्हणाला, 'काही काळजी करू नका. मी माझे काम व्यवस्थित करीन. अगदी पूर्ण फत्ते होईल हे काम. मग तर ठीक ना?'

राजकुमारी विचारांच्या तंद्रीतच किल्ल्यावर परत आली. तिला सारखे वाटत होते, की तो सर्वसाधारण शेतकरी नव्हता. तो एक असामान्य माणूस होता व ती तिची शंका अगदी बरोबर होती.

## पाच

दुसरे दिवशी राजकुमारीने काय विचार केला माहीत नाही पण तिने वेष मात्र बदलला नाही. ती आपल्या नेहमीच्याच वेषात बाहेर पडली. किल्ल्याच्या दरवाज्याजवळ येऊन पहारेकऱ्यास बोलावून ती म्हणाली, 'मी बाहेर जात आहे ही गोष्ट कोणास सांगू नकोस. मी मध्यरात्रीला परत येईन.'

द्वारपाल नम्रपणाने म्हणाला– 'राजकुमारी, आपल्या आज्ञेचे पालन होईल.'

राजकुमारी कालच्या रस्त्यावर येऊन भरभर चालू लागली. चालता चालता ती विचार करीत होती. एकदम दलपतिशाहच्या समोर जाण्या-पेक्षा झाडीमध्ये लपून त्यांना दुरून न्याहाळून पाहणे जास्त चांगले आहे. प्रथमच त्यांना आपण भेटत आहोत. शिवाय महाराज आपणास भेटण्यास किती उत्सुक आहेत हे पण समजेल! तेव्हा तिने आपल्या मनाशी हा विचार पक्का केला मग ती आणखीनच भरभर चालू लागली. ठरलेल्या जागी पोहोचल्यावर तिने इकडे तिकडे पाहिले आणि तेथे अस-लेल्या दाट झाडीमध्ये लपून बसली. अजून भेटीची वेळ झाली नव्हती. म्हणून राजकुमारी राजाची मार्गप्रतीक्षा करू लागली. त्या वेळी तिचे मनात निरनिराळ्या विचारांची गर्दी झाली होती. थोड्या वेळाने कोणाच्या तरी पावलांची चाहूल ऐकू येऊ लागली. ती सावध होऊन पाहात राहिली. आणि तिला फार आश्चर्य वाटले. ती आपल्याशीच हसून म्हणाली की, हा तर कालचाच शेतकरी आहे! तथापी तो आज राजाच्या वेषात किती सुंदर दिसत आहे! स्वच्छ चांदणे व गर्द जंगल आणि त्यामध्ये राजा

दलपतिशाहसारखा सुंदर महाराजा! खरोखर त्यामुळे हे सर्व किती रमणीय वाटत आहे. राजकुमारी आपला श्वास रोखून महाराजांना एकटक पाहात होती.

आता राजकुमारीस त्याच्यापुढे येण्यास संकोच वाटू लागला. तिच्या मनात विचार आला की येथूनच आपण निघून जावे. राजाचे दर्शन घेण्याची इच्छा पुरी झाली आहे. परंतु दुसरा विचार मनात आला, की राजाला असा धोका देणे ठीक नाही. त्यांना मी जर पाहिले आहे तर त्यांनी मला पाहणे जरुरी आहे. त्यांच्या माझ्याविषयीच्या काय काय कल्पना आहेत, कोण जाणे? तेव्हा त्यांच्याशी बोलण्यास काही हरकत नाही असा राजकुमारीने विचार केला व ती एकदम झुडपातून बाहेर आली. विचाराच्या तद्रींत असलेल्या व प्रतीक्षा करत असलेल्या महाराजांनी झाडाची सळसळ ऐकून एकदम थांबून विचारले, 'कोण आहे?'

राजकुमारी हळूच समोर येऊन म्हणाली, 'मी गोंडवनाच्या पराक्रमी महाराजांसमोर उभी आहे ना?'

दलपतिशाह मोठ्या गौरवाने एकटक नजरेने पाहू लागले. तिच्या कोमलतेने व सुंदरतेने महाराज अगदी मोहित झाले. ते आश्चर्याने म्हणाले–कालिंजरच्या गुणवान राजकुमारी दुर्गावतीसमोर मी उभा आहे ना?'

राजकुमारी हळूच आणि लाजून म्हणाली–'होय महाराज! काल आपण फसवलेत मला. का?' दलपतिशाह हसून म्हणाले, 'मग मी पण हाच प्रश्न राजकुमारीला विचारू का?'

'पहिल्याने महाराजांनी उत्तर द्यावे. नंतर मग त्यांनी विचारावे. अगोदर कर्तव्य करावे लागते तेव्हा मग अधिकार मिळतो.' राजकुमारी गालातल्या हसून उत्तरली.

'कर्तव्य तर गेले कित्येक रात्री करत आलो आहे.' दलपतिशाहने दीर्घ श्वास घेत म्हटले–'सर्व रात्री कालिंजरची धूळ तुडवीत राजकुमारीच्या



भेटीसाठी व्याकुळ होऊन काढल्या आहेत तेव्हा कोठे नशिबाने आजचा दिवस दाखवला आहे. तेव्हा अधिकाराचा उपयोग का करू नये? राजकुमारी मला तशी सवलत देणार नाहीत का?'

राजकुमारी हसत होती.

दलपतिशाह पुन्हा म्हणाले, 'मी हल्ला करण्याच्या अगोदर राजकुमारी-कडून दोन गोष्टींचे वचन मला हवे आहे. आणि म्हणूनच तुम्हाला भेटण्यासाठी इतका बेचैन आहे. तेव्हा हे सर्व नीट समजावून घ्यावे. राजकुमारी, खरोखर माझ्या जीवनात तुझे स्थान फार मोठे आहे. तुझ्या-वाचून मी राहू शकत नाही. म्हणून पहिले वचन असे की तू कोणत्याही परिस्थितीमध्ये आत्महत्या करावयाची नाही. नंतर दुसरे वचन—मी युद्धात विजयी झालो तर तू माझ्याशी विवाह करून वडिलांचा त्याग केला पाहिजे. ह्या अटी तुला मान्य आहेत का? नाही तर मी सर्वसंग परित्याग करून राहिलेले आयुष्य वनवासात घालवणार आहे.'

यावर राजकुमारीने मौन राहून, हसून मान हलवून त्यांना आपली पसंती दर्शविली. आणि म्हणाली– ' आता मी आपली जाण्यासाठी आज्ञा मागत आहे. ' ती किल्ल्यावर परत आली. इकडे स्वप्नामध्ये तरंगत व विचाराच्या धुंदीत राजा आपल्या छावणीत परतला.

सकाळ झाल्याबरोबर लढाईची रणशिंगे आणि नगारे गर्जू लागले. दल-पतिशाहने आपल्या सैन्याला हुकूम दिला. त्याचे सैन्य उत्साहाने कालिं-जर सैन्यावर तुटून पडले.

तिकडे कीर्तिरायसुद्धा तयारच होते. त्यांनी आपल्या सैन्याला युद्धाचे आवाहन दिले व ते सैन्य किल्ल्याच्या बाहेर पडले. दोन्ही सैन्ये एक-मेकास भिडली. बाण, भाले, बरची, तलवारींचे आवाज उठले. प्रेतांचे ढीग पडू लागले. रक्ताच्या नद्यांचे पाट लोटले. सगळीकडे हाहा:कार माजला. दुपार झाली. दोन्ही सैन्ये खूप शौर्याने लढत राहिली. दलपतिशाह आपल्या सैन्याला उत्तेजन देत चोहोबाजूंनी हिंडत होते. त्यामुळे सैन्याला स्फुरण चढले, भयंकर युद्ध सुरू झाले. कालिंजरची सेना पण मोठ्या धैर्याने टक्कर देत होती. परंतु लौकरच ती मागे हटू लागली. कीर्तिरायने खूप उत्साह दिला पण ते दलपतिशाहच्या सैन्यापुढे माघार घेऊ लागले आणि चारी दिशेस पळत सुटले. सगळीकडे गोंधळ उडाला, कोणाला काही समजेना. कीर्तिराय पण त्या गर्दीतून निसटले आणि किल्ल्यावर जाऊन त्यांनी दार बंद करून घेतले.

विजय मिळालेल्या दलपतिशाहने किल्ल्यास वेढा दिला. गोंडवानांची सेना किल्ला काबीज करण्यासाठी लढू लागली. परंतु पुष्कळ दिवस लोटले, तथापी गड काही हाती येईना. किल्ला अगदी मजबूत होता. दलपतिशाह विचारात पडले. एकाएकी त्यांना एक युक्ती सुचली व ते तंबूबाहेर आले. आणि निवडक शिपाई बरोबर घेऊन किल्ल्याच्या मागील भागात गेले. तेथून किल्ल्याचे पाणी मोठ्या नाल्याच्या साह्याने बाहेर काढले होते. त्यांनी

एका शिपायास हळूच सांगितले, ' या नाल्यावाटे पोहत जाऊन किल्ल्यात प्रवेश करावयाचा व दार उघडावयाचे ! काम फार धाडसाचे व कठीण आहे. '

सैनिक म्हणाला– ' पण सरकार ह्या नाल्यात वर काटेरी तार पसरली आहे. ती कापल्याखेरीज जाता येणार नाही. '

' त्या तारेच्या खूप खालून पोहत जाता येईल व किल्ल्यात प्रवेश मिळवता येईल. मी पहिल्याने उडी घेतो. माझ्या मागून तू ये.' दलपतिशाह म्हणाले.

शिपाई तयारी दाखवीत म्हणाला, ' होय सरकार, फार सोपे काम आहे. आपण नका येऊ. आपण फक्त हुकूम द्या की आम्ही आत जाऊ. फक्त काय करायचे ती आज्ञा द्या ! '

राजाने त्याला सर्व समजावून सांगितले, ' तू कसेही करून किल्ल्याच्या पाठीमागील दार उघड. तेथे मी थोड्याशा सैन्याला घेऊन दरवाज्याच्या बाहेर तयार राहतो. तू दार उघडताच आम्ही आत घुसू. हल्ला करू व अशा प्रकारे किल्ला आपल्या ताब्यात येईल. परंतु हुषारीने राहा. '

सैनिक म्हणाला– ' महाराज काही काळजी करू नका. देव यश देईल व लौकरच महाराजांचा झेंडा किल्ल्यावर फडकत राहील. आपण तयारीस लागा. '

एक सैनिक पहिल्याने नाल्यात उतरला. नंतर त्याचे पाठोपाठ आठ जवानांनी उड्या मारल्या. ते सर्वजण पोहत किल्ल्याच्या आत गेले.

दलपतिशाह भरभर आपल्या छावणीत परत आले. त्यांनी सैन्यनायकास बोलावून सर्व गोष्टी सांगितल्या आणि गुपचूप सैन्याला घेऊन चलण्याचा हुकूम दिला. महाराज पण सशस्त्र होऊन सैन्याच्या बरोबर चालले आणि किल्ल्याच्या दाराजवळ येऊन ते उघडण्याची वाट पाहू लागले.

फार वेळ झाला नाही तोच आतमध्ये एकदम आरडाओरड ऐकू आली आणि किल्ल्याचा भक्कम दरवाजा उघडला गेला. दलपतिशाह व त्यांचे सैन्य किल्ल्यात घुसले. घनघोर लढाई सुरू झाली. कीर्तिरायचे बरेच शिपाई मारले गेले व बाकीचे पळून गेले.

कीर्तिरायने आरडाओरड ऐकली. त्यांना कळून चुकले की शत्रूने किल्ल्यात प्रवेश केला आहे. त्यांनी आपली तलवार घेतली व ते महाला-बाहेर पडणार तोच राणी व राजकुमारी त्यांना येऊन बिलगल्या. त्या दोघींनी त्यांना जाऊ दिले नाही.

किल्ल्यावर दलपतिशाहचा अधिकार झाला. ठिकठिकाणी गोंडवानी सैनिक पहारा देऊ लागले. कीर्तिरायचे सैन्य बंदीवान झाले. सकाळ होताच किल्ल्याचा कारभार दलपतिशाहच्या हाती आला. दिवस वर आला आणि दलपतिशाह आपल्या छावणीत परत आले.

दुपार उलटून गेली. दलपतिशाह आपला मंत्री अधारसिंहाला बरोबर घेऊन कीर्तिरायला भेटण्यास आले. दूताकरवी त्यांना सूचना दिली. ते ऐकून त्यांचा आपल्या कानावर विश्वासच बसेना व ते दूताकडे आश्चर्याने पाहू लागले. त्यांना वाटले की आता आपल्याला बंदी करून दलपति-शाहच्या पुढे उभे करतील ! परंतु दुसरेच काही घडत आहे.

'दलपतिशाह खरोखरच पराक्रमी आणि योग्य असे राजे आहेत. ते अजून मला मोठे समजतात. किती थोर आणि उदार त्यांचे मन आहे !' कीर्तिरायचे मन भरून आले. दलपतिशाहच्या वर्तनाने त्यांच्यावर फार मोठा परिणाम झाला होता. ते आपल्या महालातून बाहेर पडले आणि राजा व मंत्री दोघांचाही मोठा आदरसत्कार केला.

दलपतिशाहला चांगले समजून आले की आपल्या वागणुकीचा प्रभाव कीर्तिरायवर चांगलाच पडला आहे. म्हणून पुन्हा नम्र स्वरात ते म्हणाले, 'मी आपणास त्रास दिला आहे त्याबद्दल क्षमा मागतो. मी रागाने

आपल्यावर आक्रमण केले होते. त्याचे मला फार वाईट वाटते. मी सकाळीच कालिंजर सोडून जाईन. आपण राजकुमारीचा विवाह आपल्याला जो योग्य वाटेल त्याबरोबर करून द्या. मी सर्व आयुष्य अविवाहित राहून काढीन.'

कीर्तिरायचा जो काही राहिलेला राग होता तो पण दलपतिशाहच्या नम्रतेने विरघळून गेला. त्यांनी उठून आलिंगन दिले. त्यांचे डोळे भरून आले. ते म्हणाले– 'बेटा, मला आता आणखी शरमिंदा करू नकोस. तुझ्या सारखा गुणवान् योग्य पती आणखीन् दुसरा कोण मिळणार आहे? माझ्या डोळ्यांवर उंच-नीच जातीचा पडदा पडला होता, तो फाटून गेला. मला फार वाईट वाटते.' कीर्तिरायने आपले डोळे पुसले. क्षणभर कोणीच बोलले नाही. पुन्हा कीर्तिराय म्हणाले– 'अधारसिंहजी, राजगुरूकडून मुहूर्त काढून विवाहाची तयारी करा. अशा शुभ कार्याला उशीर होता कामा नये.'

'महाराजांची आज्ञा शिरसावंद्य! आतापासून तयारीस लागत आहोत.'

## सहा

शुभ मुहूर्तावर मोठ्या थाटाने राजकुमारींचा विवाह दलपतिशाहच्या बरोबर साजरा झाला. कालिंजर उंच-नीच आणि कुळाची परंपरा, खोटी मर्यादा वगैरे अपमान विसरून मोठ्या आनंदाने लग्न सोहळा साजरा करत होते. कीर्तिरायांचे डोळे पाण्याने भरून आले होते. दुर्गावती राणी बनून गढमंडळमध्ये प्रवेश करती झाली. राजधानीच्या लोकांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. महिनाभर पंच पक्वानांची जेवणे व नाचगाण्याला नुसती भरती आली होती. राज्यात आनंदीआनंद भरून राहिला होता.

आणि राजा-राणीच्या सुखाला तर सीमा नव्हती. दोघेही आनंद-सागरात पोहत होते. ते एकमेकांच्या सुख-दुःखाला फार जपत होते. दुर्गावती राणी आपल्या पतीला प्रत्येक गोष्टीत मदत करून त्यास सुखवीत होती. आणि आपल्या कर्तव्याचे पालन करण्यास सदैव तयार असे. राज्य-कारभारात सुद्धा योग्य सल्ला-मसलत करून मदत करीत असे. दलपतिशाह तिचा सल्ला घेत व तदनुसार काम करत असत. त्यांना राणी राज्यकारभारात किती चतुर आणि हुषार आहे त्याबद्दल पूर्ण विश्वास होता. वेळ पडल्याम राणी एकटी राज्यावर नियंत्रण करू शकेल याचाही त्यांना अनुभव आला होता. आणि या सर्व राणीच्या गुणावर ते फार खुष होते. अशा रीतीने त्यांचे दिवस आनंदात चालले होते. काही दिवसांनी राणीला पुत्र-रत्न झाले. दलपतिशाह तर आनंदाने नाचत राहिले. राज्यात घरोघरी तुपाचे दिवे लागले गेले. मंदिरात आणि मशिदीमध्ये राजपुत्रासाठी दीर्घायुष्य चिंतन व परमेश्वराच्या प्रार्थना होत होत्या. गोंडवान राज्यात महिनाभर नाच, गाणे, तमाशा वगैरे समारंभ चालले होते. सगळीकडे आनंदीआनंदी भरून

राहिला होता. दलपतिशाहने गरीब व दुःखी लोकांना उदारपणे दानधर्म केला.

राजकुमाराचे नाव वीरनारायण ठेवले.

मनुष्य एक योजतो परंतु दैव दुसरेच योजत असते. केव्हा काय होईल ह्याचा काही भरवसा नाही. एके दिवशी राजा शिकार करून परत आला होता तोच राजास एकाएकी ताप आला. आणि तो हळूहळू वाढतच गेला. रोगाचे चिन्ह ठीक नव्हते. वैद्य हकीम बोलावले. दुसऱ्या ठिकाणचे प्रसिद्ध वैद्य बोलावले. त्या सर्वांनी औषधांची पराकाष्ठा केली. परंतु आजार काही कमी होईना.

दुर्गावती राणीची चिंता वाढत होती. औषधाची काही मात्रा लागू पडेना व दिवसेंदिवस राजा खंगत चालला. सर्वजण घाबरून गेले होते. काही उपाय सुचेना. एके दिवशी राजाने दुर्गावतीला आपल्या जवळ बसवून म्हटले,—'राणी ईश्वरी इच्छेपुढे मानवी प्रयत्न व्यर्थ आहेत. आता मी यातून बरा होईन असे मला वाटत नाही. औषधाचा काही गुण न येता आजार बळावतच चालला. ईश्वराची जशी इच्छा असेल तसे होईल.'

राणी त्याच्या तोंडावर हात ठेवून दुःखीत अंतःकरणाने म्हणाली, 'नाथ असे काही बोलू नये. महाराज, मला एकटीला सोडून जाऊ नका.' व ती त्यांना घट्ट मिठी मारून रडू लागली.

राजा तिच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाला—'राणी मरणे वा जगणे आपल्या हातात नाही. ते देवाच्या इच्छेवर आहे. आणि तो ठेवील तसेच राहणे आपल्या हातात आहे. देवावर विश्वास ठेव आणि स्वतःला सांभाळून राहा. तूच आपला धीर सोडलास तर वीरनारायणाचे कसे होईल? तो अजून लहान आहे. तुलाच आईबरोबर वडिलांचेही कर्तव्य करावयास पाहिजे. ही जबाबदारी तुलाच पार पाडली पाहिजे.'

'मी ही जबाबदारी नाही पार करू शकणार! नाथ, मी आपणास कोणत्याही स्थितीत सोडू शकत नाही. मला आपण आपल्या चरणापासून दूर करू नका. मी आपणावाचून जिवंत राहू शकणार नाही! महाराज, महाराज.' राणी ओरडून जास्तच रडू लागली.

पुन्हा राजा तिला प्रेमाने थोपटत राहिला. त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. लवकरच त्याने स्वतःला आवरले आणि राणीस धीर देत म्हणाला, 'दुर्गा, माझी तरी कोठे इच्छा आहे की तू माझ्यापासून दूर व्हावेस? तू मला सदैव पाहिजेस. तथापी वीरनारायणाकडे आपणास लक्ष दिले पाहिजे. आपल्या सुखाकरिता त्याचे जीवन नष्ट करावयाचे हे योग्य आहे का? आता तुझे पहिले कर्तव्य त्याचे पालन-पोषण करणे व त्याचबरोबर या राज्याची काळजी घेणे. ज्या वेळी आपला बाळ मोठा होईल त्या वेळी त्याचेवर राज्य कारभार सोपवून तू माझ्याजवळ ये. मी स्वर्गात तुझी प्रतीक्षा करीत राहीन. माझा आत्मा तुला कधी विसरणार नाही.'

अजूनही राणी रडत होती. 'महाराज, मला आपल्या वियोगाची कल्पना सहन होत नाही. माझ्याने हे काही होऊ शकणार नाही. नाथ, मी तुमच्याबरोबर सती जाणार. आपण मला दूर लोटून अशी तळमळत राहण्याची आज्ञा देऊ नका.'

राजा शांत राहिला. तो काही बोलला नाही. राणी उठून दुसऱ्या खोलीत गेली आणि बराच वेळ रडत राहिली. दुसऱ्या दिवशी राजाची प्रकृती जास्तच बिघडली. दोन तीन रात्री अगदी बेचैन अवस्थेत गेल्या. मधून मधून जीव घाबरत असे. राजाला समजून चुकले की आपण आता फार थोड्या वेळाचे सोबती आहोत. राणी दुःखी मनाने पलंगाजवळ अश्रू ढाळत उभी होती. राजाने तिला पलंगावर बसण्यास सांगितले. राणी बसल्यावर, त्यांनी दासीला वीर नारायणास आणण्यास सांगितले. तीन वर्षाच्या राजकुमाराला राणी दुर्गावतीने आपल्या मांडीवर घेतले. दलपति-

शाह काही वेळ राजकुमाराकडे पाहात राहिले. नंतर दुर्गावतीचा हात पकडून राजकुमारच्या डोक्यावर ठेवून हळू आवाजात म्हणाले, ‘ तुला आपल्या बाळाची शपथ आहे. मी मेल्यानंतर सती जायचे नाही, तर बाळाचे पालन करावयाचे. राणी शपथ घे. ’

राणी पुन्हा जास्तच रडू लागली. ती अशी शपथ घेण्यास तयार नव्हती. म्हणून काही न बोलता रडतच राहिली. ‘ राणी, माझ्या आत्म्याला दुःख होईल. तू जर वचन दिले नाहीस तर, मला मरण शांतपणे येणार नाही. वेळ फार थोडा आहे. माझी विनंती मान्य कर. ’ आता राजाचे शब्द अडखळत येऊ लागले आणि श्वास कमी व मंद होऊ लागला.



दुर्गावती फार अगतिक होऊन रडत होती. तिने फक्त मान डोलावूनच राजाला वचन दिले. तेव्हा राजाच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. त्याने अस्पष्ट आवाजात 'अधारसिंह' असा उच्चार केला, त्याबरोबर अधारसिंह व अनेक सरदार महालात आले. सर्व लोक दुःखाने डोळे पुसत होते. दलपतिशाह क्षणभर सर्वांना पाहात राहिले. मग मोठ्या कष्टाने हळू आवाजात म्हणाले, 'परमेश्वरी इच्छा ही होती. मंत्री यांना सांभाळा.' व नमस्कार केला. त्यांचे डोळे बंद झाले. अधारसिंह म्हणाले, 'महाराज असे बोलू नका.' तोपर्यंत राजाच्या जीवनाचा दीप विझून गेला. सगळीकडे अंधार दाटला. सर्व नगर क्षणात दुःखात बुडून गेले. राणी दुर्गावतीच्या दुःखाला तर सीमा राहिली नाही. मोठे मोठे मंत्री, सरदार दुःखाने शोक करू लागले. अगदी हाहाःकार उडाला.

## सात

महिनाभर गडमंडळ राज्यात शोक पसरला होता. राणी दुर्गावती अगदी क्षिकट पडून अशक्त झाली होती. महाराजांच्या मृत्यूनंतर तिने खाणे-पिणे सोडले होते. चेहरा मलूल, उदास होता. परंतु तिने कितीही मरण्याची इच्छा केली तरी ते थोडेच येणार होते! अधारसिंहना राणीची स्थिती पाहून फार वाईट वाटत होते. ते राणीची खूप समजूत घालीत व तिला आपल्या कर्तव्याची जाणीव करून देत आणि गोंडवानाचे राज्य सांभाळण्याची विनंती करत असत.

मंत्र्याच्या या प्रयत्नास यश आले व राणीमध्ये हळूहळू फरक दिसू लागला. ती थोडे थोडे खाऊ-पिऊ लागली आणि राज्यासंबंधी विचार-विनिमय करू लागली. अधारसिंहाला आनंद झाला. त्यांनी मनोमन ईश्वराचे आभार मानले आणि पुन्हा आपल्या प्रयत्नास लागले. राणीने आपल्या पतीला दिलेले वचन पूर्ण करण्याचा निश्चय केला. कर्तव्याचे पालन करणे हाच तिचा धर्म होता व म्हणून ती अधारसिंहाबरोबर राजकारभाराविषयी सल्लामसलत करीत असे. अधारसिंह पण राणीस सर्व बातमीत माहिती देऊन योग्य तो सल्ला देत. त्यावर राणी ध्यान देऊन विचार करी व निर्णय घेई. राणीची प्रकृती ठीक झाली तशी राणी राज्य-कारभारात जास्त लक्ष देऊ लागली.

एका शुभ मुहूर्तावर मोठ्या समारंभाने राजकुमार वीर नारायण यास गोंडवानाच्या गादीवर बसविले. राजकुमार लहान होते म्हणून त्यांची माता दुर्गावती राज्याचा कारभार पाहात होती. प्रथम तिने राज्याची नीट व्यवस्था करून त्यास मजबुती आणावयाची ठरवले. दरबार राजमाता

दुर्गावती आणि राजकुमार बीरनारायण ह्यांच्या जयजयकाराने दणाणून गेला. सर्वजण फार आनंदात होते. सर्व राज्यात लवकरच प्रसन्नतेचे वारे खेळू लागले. दुर्गावती राणी आपल्या मुलास मांडीवर घेऊन सिंहासनावर बसली होती.

दुर्गावती शूर, साहसी आणि बुद्धिवान होती. शासनकर्त्यांची कुशलता पण तिच्या अंगी होती. तिने पहिले कोणते काम केले असेल, तर ते म्हणजे अधारसिंहाबरोबर सर्व राज्याची पाहणी केली. त्यामुळे तिला आपल्या प्रजेची व राज्याची चांगल्या प्रकारे माहिती झाली. तिने शेत-कऱ्यांना मदत करावयाची ठरवले. कर माफ केला. धान्याची उपज वाढवण्यासाठी राजकोषातून धन देण्याची व्यवस्था केली. अशा तऱ्हेने सुख-समृद्धी वाढू लागली.

इकडे सुख-संपत्ती वाढत असता देशाला मजबूत पण करावयास पाहिजे, म्हणून गोंडवानाच्या संरक्षणाकरिता राणी स्वतः जातीने लक्ष देऊ लागली. ती घोड्यावर बसून दररोज सैन्याची पाहणी करीत असे. हळूहळू सैन्याची संख्या पण वाढू लागली. ती संख्या वीस हजारांपर्यंत गेली तसेच एक हजार हत्ती झाले होते. इतकी मोठी सेना गोंडवान राज्यात कधी झाली नव्हती. राणीने हरप्रयत्नाने आपल्या राज्यास मजबुती आणली. तिच्या या सामर्थ्याने दुसरी राज्ये भिऊन असत. तिचा दरारा चोहीकडे पसरला होता आणि घरोघरी तिच्या बुद्धीची व शौर्याची वाहवा होऊ लागली होती. राणी अशा मनोमन ध्येयाने काम करत होती व म्हणून दिवसे दिवस राज्याची भरभराट होत राहिली. सुखशांतीने दिवस चालले होते. प्रजा राणीचा जयजयकार करून तिला भलाई देत होती.

त्यावेळी हिंदुस्थानचा सम्राट जरी अकबर होता, तरी पूर्णपणे सर्व देश याच्या अधिकाराखाली नव्हता. अकबर फार महत्त्वाकांक्षी होता. तो हिंदुस्थानचा सार्वभौम सम्राट होण्याची स्वप्ने पाहात होता. त्यासाठी

देशाचा एकेक भाग आपल्या अधिकाराखाली आणण्याचा त्याचा प्रयत्न सुरू होता. सगळ्यात मोठी आणि लहानात लहान अशी सर्व राज्ये त्याची गुलाम होऊन त्यांनी त्याची सत्ता मानावी अशी त्याची इच्छा होती. तो स्वार्थ बुद्धीने, जे राजे व सरदार त्याला मिळत नसत ते जरी निर्दोष असले तरी अशा राजांना व सरदारांना काही एक विचार न करता कडक शिक्षा करत होता. काहीशी लढाया करून त्यांना ठार करत होता. त्यातील बरीचशी राज्ये अकबराशी मैत्रीचे नाते टेवून होती. परंतु अकबराने सम्राटाच्या धुंदीत त्यांनाही धुळीत फेकले व पुन्हा त्याचे लोभी मन सार्वभौमत्वाची स्वप्ने रंगवू लागले, पण अखेर ते स्वप्नच ठरले.

अकबराची सेना एकेक राज्य जिंकून घेत असे. अजमेर, जोधपूर, ग्वालियर, माळवा वगैरे राज्यांशी लढाया करून त्यांना त्याने आपल्या अधिकारात आणले. ती गुलाम झाली. आता मेर्था राजाची पाळी आली. त्याचा शासक जयमल होता. मेर्थाचा किल्ला बळकट होता. पण अकबराच्या अफाट सेनेपुढे तो कितीसा टिकणार? जयमलाने अकबरची सत्ता स्वीकारली.

दिल्लीचा सम्राट अकबर विजयोत्सव साजरा करत होता. त्यामध्ये जिंकलेल्या सगळ्या प्रदेशांचे राजे, सुभेदार, अधिकारी यांना बोलावले होते. त्यात कडाचा सुभेदार आसफखा सुद्धा होता. खूप थाटात उत्सव चालला होता. समारंभ संपल्यानंतर एका रात्री असफखा व अकबर असे दोघेच अकबराच्या महालात होते. अकबराने त्यांस बसण्यास सांगितले. अकबर बराच वेळ विचार करून म्हणाला– ‘आम्ही तुला यावेळी एक खास सल्ला घेण्यासाठी बोलावले आहे. गोंडवानाच्या बद्दल तुला काही माहिती आहे का?’

आसफखा म्हणाला– ‘जहांपनाह, चुकीची माफी असावी. मला असे वाटते की गोंडवानावर आपण जर अधिकार नाही केला तर एके दिवशी त्यांची महाराणी जहांपनाहांची डोकेदुखी होईल.’



अकबर आश्चर्याने म्हणाला-- 'खरंच ! काय म्हणतोस तू ?'

'होय, गरीबपरवर ! दलपतिशाहच्या मरणानंतर त्याची राणी दुर्गादेवीने राज्यकारभार चांगल्या तऱ्हेने सांभाळून त्यात खूप सुधारणा केल्या आहेत व सामर्थ्य खूप वाढवले आहे आणि दिवसे दिवस वाढवीत आहे. या वेळी तिच्याजवळ चांगली ताकदवान फौज आहे. चोहीकडे चांगलाच दरारा बसवला आहे.

आसफखांचे बोलणे ऐकून अकबर विचारात पडला व थोड्या वेळाने म्हणाला, 'बाईमाणूस असून इतकी शूर आणि हुषार आहे ! असो, तू

गोंडवानाच्या बाबतीत सर्व माहिती काढण्याचा प्रयत्न कर. आपणास लवकरच तिचे हे सामर्थ्य नाहीसे केले पाहिजे.'

आसफखा खूष होऊन बोलला– 'शहनशहांचा विचार अगदी योग्य आहे व असे करणे जरुरी आहे. खरं म्हणजे तिने आतापर्यंत स्वतः येऊन जहांपनाहांची माफी मागून चरणाची दासी व्हावयास पाहिजे होती.'

अकबर बराच वेळ विचार करीत होता. नंतर मग म्हणाला– 'परंतु मला वाटते, तिच्या पाठीमागे गोंडवानचे मंत्री अधारसिंहाचा भक्कम आधार आहे. तो फार मोठा महत्त्वाकांक्षी, दूरदृष्टीचा आणि विचार करणारा मनुष्य आहे.'

आसफखाने लगेच होय म्हणून मान डोलावली.

अनुक्रम ... वि. बा-वा
क्रमांक ३५१८ नोंद दि.

# आठ

अकबर रात्रंदिवस गोंडवानाचे राज्य जिंकण्याचा विचार करत होता. त्याला गोंडवानाशिवाय काही सुचत नव्हते. गोंडवाना राज्य इतके शक्तिशाली झाले आहे ह्याची कल्पना त्यास नव्हती. तो गोंडवाना राज्य साधारण आहे असे समजून होता. त्यामुळे हे ऐकून त्याची चिंता वाढली होती. आता लवकरात लवकर राणी दुर्गावतीचा पराजय करून गोंडवानाला आपल्या अधिकाराखाली घेण्याचे आवश्यक झाले होते. त्याला काही सुचत नव्हते. निर्दोष राणी दुर्गावतीविरुद्ध युद्ध करण्यात त्यास यत्किंचितही गैर असे वाटत नव्हते. शेवटी एक दोन दिवसात त्याला एक युक्ति सुचली.

त्याने राणी दुर्गावतीस एक पत्र पाठविले. त्यामध्ये त्याने अधारसिंहाला दिल्लीला पाठवून देण्याबद्दल लिहिले. राणीने ते पत्र अधारसिंहाना दाखवले. पत्र वाचून ते विचारात पडले. काही वेळाने म्हणाले. 'मला दिल्लीला बोलवण्याचे काही कारण कळत नाही राणीजी!'

'हे मी पण समजू शकत नाही मंत्रीजी! परंतु माझा अंदाज असा आहे की गोंडवानाबद्दलच काही विशेष बोलणी असतील. नक्कीच हे राज्य अकबराच्या डोळ्यात सलत असेल!' अधारसिंहा मान हलवून म्हणाले, 'होय मला पण तेच वाटतेय. पण मला बोलावून घेण्याचे काय कारण? मला तुमच्यापासून अलग करण्याचा विचार दिसतोय त्याचा!'

'होय असाच काहीतरी विचार असेल! त्याला वाटत असेल की आपल्याला माझ्यापासून फितूर केले की गोंडवाना राज्य सहज जिंकता येईल.' राजमाता हसत बोलत होती.

अधारसिंह विचारात पडले. राणी पण विचार करत होती. हे एक

नवीनच संकट उभे राहिले. काही वेळाने अधारसिंह म्हणाले, 'काही असो, दिल्लीला तर जावेच लागेल. आपल्याकडून त्याला कोणत्याही प्रकारची संधी का म्हणून द्यावी ? उद्या मी येथून जाईन. आपण कोणत्याही प्रकारची काळजी करू नये. सर्व आयुष्यभर आपले अन्न खात आलो आहे. आता म्हातारपणी मी निमकहराम नाही होणार. ज्या भूमीमध्ये जन्म घेतला आहे, तीकरिता माझा प्राण गेला तर मी स्वतःला भाग्यवान समजेन.'

'हे सांगण्याची जरूरी नाही मंत्रीजी, माझा पूर्णपणे विश्वास आहे आपल्यावर. जशी ईश्वराची इच्छा असेल तसे होईल. परंतु मी इतके सांगून ठेवते की कसल्याही परिस्थितीमध्ये अकबरच्यापुढे वाकणार नाही असे मला वचन द्या.'

अधारसिंह राणीपुढे आपले मस्तक नम्रपणाने वाकवून म्हणाले, 'महाराणी ! आपली आज्ञा शिरसावंद्य आहे.' राणी त्यांना दरवाज्याजवळ सोडून म्हणाली, 'कोणतीही काही कठीण परिस्थिती आली तर मला ताबडतोब कळवा. कोणत्याही गोष्टीस उशीर करू नका. गोंडवानास आपली फार जरूरी आहे.'

'आवश्यक त्या सर्व गोष्टी मी करीन राजमाता ! असे म्हणून अधारसिंह पुन्हा प्रणाम करून निघून गेले. दुसरे दिवशीच अधारसिंह दिल्लीस जाण्यास निघाले.

एक आठवड्यानंतर ते दिल्लीस सुखरूप पोहोचले. तेथे त्यांचा खूप पाहुणचार झाला. ते सम्राटाच्या अतिथीगृहामध्ये राहिले होते जवळ जवळ एक सप्ताहानंतर त्यांची भेट अकबराबरोबर झाली. महालात अकबराच्या शिवाय दुसरे कोणी नव्हते. अधारसिंहानी त्या भव्य महालात प्रवेश केल्या बरोबर अकबरला वाकून सलाम केला. अकबर मोठ्या गोड शब्दात म्हणाला, 'या अधारसिंहजी ! प्रवासात आपल्याला कोणत्याही प्रकारे त्रास तर झाला नाही ना ?'

अधारसिंहानी तितक्याच नम्रपणाने उत्तर दिले, 'नाही, गरीब परवर, काही त्रास झाला नाही. माझा प्रवास चांगल्या तऱ्हेने पार पडला.'

'राजमाता राणी दुर्गावती आणि राजकुमार तर खुशाल आहेत ना?'

अधारसिंह म्हणाले— 'होय हुजूर! आपली कृपा आहे.'

अकबर आणखीनच गोड शब्दामध्ये म्हणाला, 'आपण बसा. मला फार वाईट वाटते की, आपल्याला या वयात इतक्या दूरचा प्रवास करण्यास भाग पाडले. परंतु अगदी नाईलाज होता. आपण आल्याशिवाय विचार-विनिमय कसा करावयाचा?'

अधारसिंह आसनावर बसले आणि स्वाभावात पण तितक्याच गोड शब्दात म्हणाले, 'हे तर माझे भाग्य आहे जहांपनाह! आज या निमित्ताने हिंदुस्थानच्या सम्राटाचे इतक्या जवळून दर्शन घेत आहे. असे नशीब एखाद्याचेच असते. गरीब परवरना माझी आठवण का व्हावी?'

अकबराने मोठ्या चतुराईने सांगितले— 'या वेळी हिंदुस्थानची जी स्थिती आहे, ती पाहून असे आम्हाला वाटते की ह्या साऱ्या लहान-मोठ्या शक्तींना ठेचून टाकले पाहिजे. नाही तर त्या केव्हा आमच्या विरुद्ध उठतील याचा नेम नाही. आणि आम्ही तसे करत पण आहोत. तेव्हा आपल्याला हे माहीतच आहे.'

'होय, गरीबपरवर! हे आम्हाला चांगले माहित आहे.'

अकबर मखमली लोडाचा थोडासा आधार घेऊन ठीक बसत म्हणाला— 'आमच्या वजिरांनी गोंडवानाबद्दल तक्रार केली होती. त्यांच्या मते गोंडवानाचे राज्य पण आमच्या अधिकाराखाली आणावे. कारण त्यांचा राणीवर मुळीच विश्वास नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, राणी मुसल-मानांचा द्वेष करते आणि आपले सामर्थ्य वाढवून आमच्याविरुद्ध लढाई करण्याच्या प्रयत्नात आहे. तिने.'

'जहांपनाह, माफ करा!' अधारसिंह मध्येच म्हणाले. 'आपल्याला

पुढे बोलू न देता मी मध्येच बोलून अपराध करीत आहे. पण राणी दुर्गावतीच्या बद्दल वजीरांचे विचार खोटे आणि कोत्या मनाचे आहेत. गोंडवानात हिंदू-मुसलमान बंधू भावाने राहात आहेत. राणी दोघांना सारख्याच प्रेमभावनेने पाहात आहे. आणि दोघांच्या हितसंबंधास जपत आहे. त्या चुकूनही भेद-भाव दाखवत नाहीत. म्हणूनच ह्या कारणामुळे तेथे.... '

अकबरने त्यांना थांबवून म्हटले, ' तुम्ही म्हणता तसे असू शकेल ! आपण सांगता ते चुकीचे आहे, असे आम्ही म्हणत नाही. आणि म्हणून आम्ही आपल्या वजीरांना सांगितले की, जोपर्यंत तेथे अधारसिंहसारखा कर्तृत्ववान मनुष्य आहे, तोपर्यंत आपल्याला काळजी करण्याचे कारण नाही. एके काळी अब्दुर्रहीमखानाच्या तोंडून आम्ही आपली फार तारीफ ऐकली होती.' अकबर थोडा वेळ थांबून अधारसिंहाकडे पाहात पुन्हा म्हणाला, ' त्याच्याकडून मला हे पण समजले की दलपतिशाहच्या मरणानंतर गोंडवानाची संरक्षणशक्ती वाढवून त्याचे कीर्तीत भर टाकली, ती सर्व मेहनत आपलीच आहे. आणि म्हणूनच इकडे गोंडवानाबद्दल गोष्टी सुरू झाल्या तेव्हा आम्ही आपल्याला बोलावून आपलेही काय विचार आहेत हे जाणणे आम्हाला जरुरीचे वाटले.' अकबराचे बोलणे अगदी कपटी व चलाखीचे होते. त्याचे कपटाने भरलेले बोलणे अधारसिंहांना समजत होते. तरीसुद्धा न समजल्यासारखे करून ते म्हणाले, ' जहांपनाह, माझ्यासारख्या साधारण मनुष्याला आपण इतके महत्त्व दिले आहे, ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे ! गरीब परवर जो हुकूम कराल त्याचे पालन होईल. राणीजीसुद्धा तेथून निघताना मला वारंवार हेच सांगत होत्या. त्या स्वप्नातसुद्धा जहांपन्हाच्या विरुद्ध काही विचार करत नाहीत. वजीरांनी ग़रीब परवरना सगळे खोटे सांगितले आहे.'

अकबर डोके हलवून म्हणाला, ' आपल्या बोलण्यावर आमचा पूर्ण

विश्वास आहे. राणी दुर्गावतीचे मोगल साम्राज्यावर इतके प्रेम आहे, हे ऐकून फार आनंद होत आहे. पण....अधारसिंहजी, आता त्यांचे वय काय आहे ?'

'असेल काहीसे अठ्ठावीस-तीस जहांपनाह.'

'आणि राजकुमाराचे ?'

'तेरा-चौदा वर्षांचे !'

अकबराने पुन्हा खोचक दृष्टीने पाहात विचारले, 'राजकुमाराची संरक्षक राणीच आहे ना ?'

'हो, गरीब परवर.'

अकबर मान हलवत बोलला, 'समजले ! राणीला हुकूम चालवण्याची आवड आहे. नाही तर आपल्या धर्मात तर पती मेल्यानंतर स्त्रिया सती जातात अथवा त्या सर्व गोष्टींचा त्याग करून पुजा-पाठ करून संन्यासी वृत्तीने राहिलेले आयुष्य घालवतात.'

अधारसिंह लगेच म्हणाले, 'इच्छा तर त्यांची पण बिलकूल नाही जहांपनाह ! त्यांची सती जाण्याचीच इच्छा होती. परंतु स्वतः महाराजांनीच त्यांना तसे न करण्याबद्दल शपथ घातली आहे. त्यांनी राणीवर राजकुमाराला चांगले शिक्षण देण्याचा व त्याचे पालनपोषण करण्याचा भार टाकला आहे.'

'समजले, तर मग त्यांचा नाइलाजच होता. असो, आता त्यांची काय इच्छा आहे ? आता सुद्धा त्या राजकुमाराची संरक्षणकर्ती म्हणून राहणार आहेत की, या जगापासून अलग राहून देवाचे नाव घेत राहिलेले आयुष्य काढणार आहेत ?'

वृद्ध अधारसिंह मनातून अकबरच्या ह्या बोलण्यावर हसून बोलले,

'त्यांना तर राज्य करण्याविषयी बिलकूल प्रेम नाही, जहांपनाह ! त्या तर जितके लवकर होईल तितके ह्या राजकारभारातून मुक्त होण्याचे

पाहात आहेत. परंतु आता त्यांची प्रजा त्यांना सोडण्यास तयार नाही. प्रजेस जे सुख महाराजा दलपतिशाहच्या वेळी मिळत नव्हते तितके राणीच्या वेळेस मिळत आहे. तेव्हा अशा चांगल्या राणीस....’

अकबर मध्येच त्यांना थांबवून बोलला, ‘ पण हे सर्व करणारे तर आपणच आहात ना ? तर मग राणीच्या जागी आपण राजकुमाराचे संरक्षक, हितकारक बनला तर गोंडवानाची प्रजा ह्या गोष्टीस मान्यता देणार नाही ? ’

इतक्या उशीराने अकबर मूळ गोष्टीवर आला.

मान हलवून अधारसिंह म्हणाले, ‘ नाही, गोंडवानाची प्रजा हे पसंत करणार नाही. दुसरे म्हणजे राणीजी असताना मला राजाचा संरक्षक होण्याचा हक्कपण नाही. ’

अकबर हसून सरळ बसला. ‘ नाही अधारसिंहजी, आम्हाला ही गोष्ट पटत नाही. आपले हे म्हणणे बरोबर नाही. आपण समजत नाहीत की आपण जर राजाचे संरक्षक झालात तर आमच्या सर्व अडचणी दूर होतील. आम्हाला गोंडवानाबरोबर आमच्या वजीराचे पण हित पाहिले पाहिजे ना ! त्यांचे म्हणणे खोटे ठरवून त्यांना बाजूस सारणे केव्हाही चांगले नाही. आमची तर इच्छा त्यांना दूर करण्याची नाही व तुमच्याशी पण मैत्री तोडावयाची नाही. ’

अधारसिंह सर्व काही समजून चुकले होते. परंतु त्यांना तर समजून न समजल्यासारखे दाखवणे भाग होते. ते या वेळी दिल्लीत होते आणि सम्राट अकबरच्या समोर होते. ते म्हणाले– ‘ जहांपनाह, आपले म्हणणे ठीक आहे. मंत्र्याच्या सल्ल्याचा व हिताचा विचार करणे आवश्यक आहे. परंतु गरीब परवरांनी पुन्हा थोडा विचार करावा. राणीच्या जागी मी संरक्षक बनणे कितपत योग्य होईल ? जगाच्या आणि ईश्वराच्या दोन्ही दृष्टीने मी स्वार्थी आणि अपराधी नाही का ठरणार ? ’

अकबर हसू लागला, ‘ असे कसे बोलता आहात अधारसिंहजी !

आपले मन ठीक असले तर सर्व ठीक असते. आपण संरक्षक झालात म्हणजे त्याचा अर्थ गोंडवाना राज्य आपण थोडेच हस्तगत करणार आहात? आपण जे काही करणार ते आमच्या दोस्तीकरता व राज्याच्या भलाईकरिताच ना? आपण संरक्षक झालात म्हणजे आम्ही पण आमच्या वजीरांचे तोंड बंद करू. ते आमच्या फायद्याचे व जरूरीचे आहे.'

आणखीन काही जास्त बोलणे ठीक नव्हते. अधारसिंहांना अकबरच्या मनाचा थांगपत्ता लागला होता. आणि त्यांना कळून चुकले की अकबर काहीतरी गडबडे करणार! तरीसुद्धा त्यांनी हुषारी केली. ते म्हणाले 'जहांपनाह ह्या गोष्टीवर मला विचार करण्यास दोन-चार दिवसांची मुदत द्या.'

'काही हरकत नाही, आपण चांगल्या प्रकारे विचार करा. आता आपण जाऊ शकता.' अकबरने अशा तऱ्हेने पाहिले की जशी माशी आपल्या भक्ष्यावर लक्ष देऊन पाहते तसे. अधारसिंह उठून सलाम करत बाहेर पडले.

## नऊ

अधारसिंहानी आपले केस उन्हात पांढरे केले नव्हते. त्यांनी जगामध्ये अनुभव घेतला होता व ते जगाला चांगले ओळखून होते. ते गढमंडळहून निघाले होते त्या वेळी त्यांनी काही विश्वासू सैनिक आपल्याबरोबर घेतले होते. त्यांना नीट समजावून दिले होते की, दिल्लीला गेल्यावर ते अधारसिंहापासून वेगळे होतील आणि मग आपण दिल्लीचे रहिवासी आहोत असे सांगून वारंवार भेटण्यास येतील. त्या वेळी या दोन सैनिकांनी लोकांमध्ये व इकडे तिकडे हिंडून बातम्यांचा शोध घेऊन त्या अधारसिंहांना कळवत राहावयाच्या, असे गुप्तहेरांचे काम त्यांचेवर सोपवले. दिल्लीला पोहोचल्यावर त्या सैनिकांनी ठरल्याप्रमाणे केले. ते जातीने मुसलमान असल्यामुळे त्यांना दिल्लीच्या प्रजेमध्ये मिसळण्यास वेळ लागला नाही. अधारसिंहाने म्हणूनच दूरदृष्टीने मुसलमान सैनिकांना आपल्याबरोबर आणले होते.

अधारसिंह सम्राट अकबरला भेटून परत आले होते, तोच ते दोन्ही सैनिक तेथे येऊन पोहोचले. अधारसिंहाने त्यांना बसण्यास सांगितले. ते बसल्यानंतर एकाने हळूच विचारले, ' शहानशहाशी काय काय बोलणे झाले ? '

अधारसिंह खालच्या स्वरात म्हणाले, ' तुम्हाला तावडतोब गढमंडळला जावयास पाहिजे. एक सैनिक येथेच राहील. अकबरच्या मनात कपट आहे. तो गोंडवानाचे राज्य आपल्या अधिकाराखाली आणण्याचा प्रयत्न करीत आहे. मी राणीजींना पत्र लिहून देतो. त्यांना सांगा की लवकर लढाईची तयारी करा. ' दोन्ही सैनिक आश्चर्याने पाहात राहिले. तेव्हा

अधारसिंह पुन्हा म्हणाले, ' घाबरण्याचे काही कारण नाही. जर गोंड आपल्या बहाद्दूरीने लढला तर अकबर असा काही मार खाईल की जन्मभर त्याला त्याचा विसर पडणार नाही.'

' तर मग आपण येथे....'

अधारसिंह मध्येच म्हणाले, ' होय, अजून तरी मला येथेच राहावे लागेल! कदाचित् दोन-चार वर्षे सुद्धा राहावे लागेल. मी जर अकबराचे म्हणणे मान्य नाही केले तर तो मला कसा सोडेल? बाकी पुढील भवितव्य कोणास माहीत आहे! जे आज समोर आहे ते पाहावे.'

नंतर त्यांनी दुर्गावतीला सविस्तर हकीकतीचे पत्र लिहून दिले.

सैनिकाने विचारले, ' मी पत्र देऊन परत येऊ का?'

' नको.' अधारसिंह उत्तरले. ' एका सैनिकावर माझे काम चालेल. आता तू जा. फार हुषारीने राहा. आणि पत्र राणीशिवाय कोणाच्या हाती पडता कामा नये.'

' होय!' असे म्हणून सलाम करून तो खोलीच्या बाहेर पडला. तो गेल्यानंतर अधारसिंह दुसऱ्या सैनिकाकडे पाहात म्हणाले, ' तू परवांच्या दिवशी दुपारनंतर किल्ल्यात ' दिवाने-आम 'च्या जवळपास राहा. कदाचित् तुझी जरूरी पडेल! आता तू जा. अधेमधे येण्याची जरूरी नाही.'

' ठीक आहे!' असे म्हणून तो सलाम करून निघून गेला. तिसरे दिवशी अधारसिंहाने पुन्हा सम्राट अकबराची भेट घेतली. अकबर वाट पाहातच होता. अकबराने बोलण्यास सुरुवात केली, ' काय? आम्ही हेच समजावे काय की अधारसिंहांना आमची दोस्ती पसंत आहे?'

' जहांपनाहची मैत्री कोणाला नको आहे? परंतु गोंडवानाचा राजा वीर नारायणचा मी संरक्षक बनण्याचा जो प्रश्न आहे, त्या बाबतीत मी जहांपनाहची क्षमा मागतो. सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर माझे मन या गोष्टीस तयार होत नाही. या म्हातारपणी मी अशी बेइमानी करू इच्छित

नाही, गरीब परवर ! एके दिवशी देवाजवळ पण ह्याचे उत्तर द्यावे लागेल !'

अकबराची पण इच्छा होती की, अधारसिंहाने त्याचा प्रस्ताव स्वीकारू नये. ह्या गोष्टीस मान्यता दिली नाही की गोंडवानांशी युद्ध करता येईल आणि मग आपला अधिकार तेथे सुरू होईल. अकबराला मनातून आनंद झाला होता. तरी तो वरवर म्हणाला, 'अधारसिंह, पण आम्हाला हे समजत नाही, की आपण गोंडवानाशी बेईमान कसे होणार ? पण समजा तसे झाले तरीसुद्धा तुम्ही आमच्या मित्रत्वाच्या छत्राखाली गोंडवानातील रहिवाशांचे कल्याणच करणार ! आणि दुसऱ्याचे कल्याण करण्याच्या हेतूने केलेले काम परमेश्वर दरबारात रुजू होऊन देव त्याचे फळ तुमच्या पदरात घालीलच. तेव्हा आपण विचार करा की यामध्ये मित्रत्व साधते का शत्रुत्व सिद्ध होते आहे ?'

अधारसिंह सुद्धा मनातून आनंदीत झाले. ते अकबरापेक्षा कमी हुशार नव्हते. अकबराच्या मनात किती कपट आहे, हे ते त्याच्याच तोंडून काढून घेत होते. त्यावर ते म्हणाले– 'जहांपनाह, आपले म्हणणे खरे आहे. अगर माझ्या संरक्षक न होण्यामुळे जर वैमनस्य होत आहे, तर मी तसे करण्यास कधीही तयार नाही. मला आता जहांपनाहचा विचार पसंत आहे. गोंडवानाकरिता मी नरक भोगण्यास तयार आहे.'

अकबराची आता द्विधा मनस्थिती झाली. अधारसिंह इतक्यात 'नाही' म्हणत असता एकदम त्याने पुन्हा 'होय' म्हणून सगळ्या आपल्या डावपेचास वेगळे स्वरूप दिलेले पाहून तो जास्तीच विचारात पडला. त्याने अधारसिंहाकडून 'होय'ची अपेक्षा स्वप्नात पण केली नव्हती. तरीसुद्धा तो फार हुशार होता. एकदम तो म्हणाला, 'आम्ही फार खुष आहोत अधारसिंहजी, आपण माझा विचार योग्य मानलात आणि आम्हाला धर्मसंकटातून सोडवलेत. नाहीतर आम्हाला आमच्या वजीरांचा सल्ला ऐकून नाईलाजाने गोंडवानावर चढाई करावी लागली असती, फार फार आनंद झाला.'

अधारसिंह खाली मान घालून गप्प बसले.

'आम्ही आजच कडाचा सुभेदार आसफखाला लिहून कळवतो की आमच्यातर्फे गोंडवानाच्या सरहद्दीवर आपले स्वागत करून आपल्या देखरेखीत गोंडवानात आपणास राजकुमाराचे संरक्षक नेमून पुन्हा कडाला परत जा.'

अकबराची ही चलाखी त्यांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. आणि अकबरपण ओळखून होता की अधारसिंह या गोष्टीस तयार होणार नाहीत.

अधारसिंह लगेच म्हणाले, 'ह्याची काही जरुरी नाही जहांपनाह! मी राजकुमाराचा संरक्षक होण्याने राज्यात काही गडबड होणार नाही. आपण सुभेदार आसफखाला काही कष्ट देऊ नका.'

'ते काही असो. आम्हाला पण चांगले माहीत आहे की तेथे आपल्या-विरुद्ध कोणी काही गडबड करू शकणार नाही! तथापी अशा महत्त्वाच्या प्रसंगी आमच्याकडून कोणी तरी हजर राहणे जास्त जरुरीचे आहे.'

'जहांपनाह, आपण योग्य तेच कराल. परंतु ह्या गोष्टीने गढमंडळच्या लोकांवर वाईट परिणाम होईल आणि ते मला विश्वासघातकी समजून विरोध करतील!' अधारसिंहाने मोठ्या धूर्तपणाने आपले बोलणे पुढे ढकलले.

अकबराने कपाळास आठ्या घालून म्हटले, 'काय?'

अधारसिंह बोलले, 'ते असे समजतील की मी जहांपनाहशी संगनमत करून गोंडवानाचा स्वामी बनू पाहात आहे. नाही तर मग लष्कर व सेनेची काय जरुरी आहे!'

अकबर ताठ्याने म्हणाला– 'काय म्हणता अधारसिंह! हे तर फारच छान आहे! खरं म्हणाल तर आम्हाला पण हेच बरोबर वाटत होते. आता आपणच हे कबूल करा म्हणजे दुसरे काही म्हणणे नाही.'

अकबराचा काय विचार आहे ते सर्व अधारसिंहांना कळून चुकले. त्याच्या ह्या बोलण्यावरून स्पष्ट झाले की तो राणी दुर्गावतीस भीत होता व कसेही करून गोंडवानाच्या राज्यावरून तिला दूर करण्याचे त्याचे प्रयत्न सुरू होते.

थोड्या वेळाने अधारसिंह म्हणाले– 'जहांपनाह, मी ही आपली अट स्वीकार करण्यास असमर्थ आहे. असे हे कृत्य मी करू शकत नाही. ज्याचे जन्मभर मीठ खाल्ले त्याचे इमान शेवटपर्यंत सांभाळणार आहे. आणि राज्याशी बेईमानी करणार नाही. जहांपनाहना....पण योग्य तोच सल्ला देत आहे की, या जगात कोणी अमर नाही. सर्वांनी देवास भिऊन राहिले पाहिजे.'

अकबर एकदम गंभीर झाला व काहीशा रागीट स्वरात म्हणाला, 'आम्ही येथे अधारसिंहाकडून सल्ला घेण्यासाठी बसलो नाहीत. आम्हाला सल्ल्याची जरूरी नाही. कोणते योग्य आणि कोणते गैर आहे हे आम्हास चांगल्या तऱ्हेने समजते आहे. तर मग आम्ही कडाच्या सुभेदाराला गोंडवानावर हल्ला करण्यास लिहू काय?'

थोडेसे हसून अधारसिंहाने उत्तर दिले, 'जहांपनाहांची मर्जी. परंतु लिहिण्यापूर्वी पुन्हा एक वेळ विचार करण्याचे कष्ट घ्यावेत. नाहीतर जहांपनाहच्या सैन्याच्या तोंडाला काळोखी फासण्याची वेळ येईल व मोठ्या पराक्रमाला डाग लागेल ही भीती पण आहे. राणी दुर्गावतीच्या शौर्यापुढे अजून तरी कोणी लढण्यास समोर आला नाही.'

अकबर रागाने बेभान झाला. 'बस करा. लवकरच आपल्याला सर्व काही कळून येईल. जेव्हा दुर्गावतीस साखळदंडाने बांधून आपल्यासमोर आणले जाईल तेव्हा काय ते बोला.' असे म्हणून त्याने टाळी वाजवली. द्वारपाल आत आला.

अकबरने हुकूम दिला, 'ह्यांना कोतवालाच्या स्वाधीन कर आणि

सांग की ह्यांना कोठडीतच बंद करून ठेवा.'

'हुकूम जहांपनाह!' द्वारपाल अधारसिंहांना घेऊन बाहेर पडला. त्या दिवसापासून अधारसिंहांना कैदेत टाकले. दुसरे दिवशी अकबराने सुभेदार आसफखाला लिहून कळवले की तू गढमंडळवर हल्ला करून राणी दुर्गावतीस कैद करून दिल्लीला घेऊन यावे.

## दहा

**अधारसिंहाने** पाठवलेले पत्र राणी दुर्गावतीने पुन्हा पुन्हा वाचले आणि ती गंभीर झाली होती. तिची शंका अगदी बरोबर होती. रात्री तिने जेवण ठीक तऱ्हेने केले नाही. मनात नाना तऱ्हेचे विचार थैमान घालत होते. तथापी ती युद्धाला भीत नव्हती किंवा तिला आपल्या प्राणाची पण पर्वा वाटत नव्हती. परंतु गोंडवानात अधारसिंहाचा अभाव फार जाणवत होता. अशा वेळी ते जर येथे असते तर पुष्कळच आधार व धीर वाटला असता, असो.

राणीला अकबराच्या समोर शरणांगती तर पत्करावयाची नव्हती. तिला आपल्या राज्याचे रक्षण करून त्याच्यासाठी सर्वस्व अर्पण करावयाचे होते. आणि अत्याचारी मुसलमानांना चांगलीच शिक्षा द्यावयाची होती. तिला आपल्या सैन्याबद्दल विश्वास होता. आणि पूर्णपणे ती समजून होती की यमाचे सैन्य जरी असले तरी त्यांना आपली सेना भयभीत केल्या-शिवाय राहणार नाही. त्याबद्दल तिला पूर्ण भरवंसा होता.

दुसरे दिवशी राणीने आपले मंत्री, सरदार आणि नगरातल्या प्रतिष्ठीत व्यक्तींना बोलावून त्यांना अधारसिंहाचे पत्र दाखवले व त्यांचा काय विचार आहे ते विचारले. सर्वांचा एकच आवाज आला की अकबराशी लढाई करून त्यास हाकलून लावावे. राणीस हे ऐकून फार आनंद झाला तिला त्यांच्याकडून हेच उत्तर येईल याबद्दल खात्री होती.

दरबार समाप्त झाल्यावर राणीने आपले फर्मान काढले. राज्याच्या वेगवेगळ्या भागांतून सरदारांना आपल्या सैन्यासह राजधानीमध्ये लवकर येण्यास लिहिले. किल्ल्याच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले. कारखान्यात जास्त

मजबुतीची नवीन हत्यारे बनविण्याचा हुकूम झाला. भरपूर व पुरेसा दाणा-गोटा पाणी यांचा साठा होऊ लागला. अशा प्रकारे फार मोठ्या प्रमाणावर युद्धाची तयारी होऊ लागली. दररोज सकाळी पुजा-पाठ करून राणी घोड्यावर स्वार होऊन दुपारपर्यंत सारखी हिंडून सैन्याची पाहणी करत असे आणि वेळोवेळी सूचना करून चांगल्या तऱ्हेने सैन्याची जुळवाजुळव करत होती. त्यांच्यात स्फूर्ती येईल असे भाषण करून मोंगल सैन्याला पराजित करण्याची भावना भडकावीत होती. सैनिक तिला साथ देत होते. आणि जीवात जीव आहे तोपर्यंत शत्रूला पाठ दाखवणार नाही म्हणून प्रतिज्ञा करत होते. ते आपल्या राणीसाठी आकाशातील चंद्र-तारेसुद्धा आणण्यास तयार होते. तेव्हा अकबराशी लढणे ही सामान्य गोष्ट होती.

सैनिकांचा हा आत्मविश्वास, शौर्य आणि स्फूर्ती पाहून राणीचा उत्साह व धीर वाढत असे. कधी कधी ती राजधानीच्या बाहेर जाऊन जवळ-पासच्या ठिकाणी हिंडून येत असे व मग युद्धास कोणते ठिकाण योग्य आहे हे पाहून निश्चित करी. दिवसेदिवस राणीचे काम व मेहनत वाढतच होती. तिला रात्र व दिवस समजत नव्हता. खाणेपिणे, झोप विसरून ती काम करत होती. राजकुमार वीरनारायण सुद्धा आईच्या कामात मदत करीत होता. तोही घोड्यावर बसून सैन्याची तपासणी करी. ज्या राज्यामध्ये असे राजकुमार व राजमाता आहेत, त्यांची प्रजा आपल्या स्वामीकरिता जे काही करील ते थोडेच आहे. गोंडवानाच्या कोपऱ्या कोपऱ्यातून हरहर महादेव असा जयघोष निनादू लागला. म्हातारे-जवान, लहान-मोठे सर्वजण कंबर कसून लढाईच्या कार्यास लागले होते. त्यांना ना घराची, बायका-पोरांची काळजी राहिली. त्यांना फक्त देशाची चिंता होती. देशाचा सन्मान आणि दुर्गावतीची इभ्रत कशी वाढवू हाच घोर त्यांच्या जीवाला लागला होता. तिच्यासाठी ते आकाश-पाताळ एक करण्यास तयार होते.

तिकडे कडाचा सुभेदार आसफखाला अकबराचा हुकूम मिळाला होता.

त्याला फार आनंद झाला. त्याच्या मनासारखे झाले. त्याची इच्छा होती की दुर्गावतीचा पराभव करून देशाच्या या भागात आपल्या पराक्रमाचा नगारा वाजवावयाचा. म्हणून लगेच त्याने सैन्यास हुकूम सोडले. युद्धाची तयारी होऊ लागली. सैन्य एकत्र जमा होऊ लागले. तोफांची संख्या वाढली. तलवारींची पाती तळपू लागली. आसफखा इकडे तिकडे सैन्यात फिरून जोरात युद्धाची तयारी करत होता. तो वरून खूप बढाया व फुशारकी मारत होता. पण मनातून भ्यालेला होता. त्याला पूर्ण समजले होते की, राणी दुर्गावतीच्या बरोबर लढाई करणे म्हणजे सिंहिणीच्या तोंडात हात घालणे आहे. पराभव झाला तर मेल्याहून मेल्यासारखे होणार.

सर्व प्रकारच्या तयारीनिशी 'अल्ला हो अकबर' अशी घोषणा करत करत विशाल मोंगल सेना गोंडवानाच्या दिशेने चालू लागली. रणवाद्ये-तुतारी, ढोलक, नगारे ह्या वाद्यांच्या गजरात डुलत डुलत हत्ती, घोडे, तोफा, पायदळ सैन्य यांच्या गडगडाटाने आकाश व धरणी कापत आहे असे वाटत होते. सर्व वातावरण हादरून गेले. धुळीने आकाश भरून गेले. आसफखा गर्वाने छाती पुढे काढून चालला होता. मार्गक्रमण करीत गावे, नगरे ओलांडून लोकांना भयभीत करत मोंगल फौज पुढे पुढे सरकत होती. गोंडवानाच्या सीमा जवळ आल्या. आसफखाने सीमेच्या आत प्रवेश केला. त्याला कोणी विरोध केला नाही. विरोध कोण करणार? राणीने पहिल्यानेच गावे आणि त्यातील मोहल्ले खाली केले होते. एवढेच नाही तर झाडांच्या फांद्या व पाने पण कापली होती. सरोवरे, तळी, विहिरी बुजवून टाकल्या होत्या. दूरदूरची जंगले, राने जाळून राख केली होती. जेणेकरून शत्रूस त्रास होऊन त्याचे हालहाल व्हावेत म्हणून दूरदृष्टीने राणीने शत्रूच्या मार्गात खूप अडथळे उत्पन्न करून ठेवले होते.

आसफखा पुऱ्या तयारीनिशी निघाला होता. तो भराभर अंतर तोडून गोंडवानाच्या हद्दीवर येऊन पोहोचला. परंतु त्याला लवकरच कळून चुकले

की गोंडवानाची सेना मोर्चा लावून थोड्या अंतरावर उभी आहे. आसफखाने पण सैन्यास आपल्या जागा घेऊन मोर्चा घेण्यास हुकूम सोडले.

एकीकडे सत्याला धरून आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करणारी निर्दोष अशी स्त्री फक्त वीस हजार सैन्यासह उभी होती तर दुसरीकडे पन्नास हजार निर्दय सेना घेऊन अत्याचारी सुभेदार काही कारण नसताना तिचा नाश करण्याकरिता सज्ज झाला होता. तो आपल्या ताकदीच्या धुंदीत मस्त झाला होता.

# अकरा

**दोन** दिवस राणीने मोंगलांच्या आक्रमणाची वाट पाहिली. परंतु आसफखाने हल्ला केला नाही. तिसरे दिवशी मोठ्या पहाटेच राणीने आपल्या सेनेला हुकूम दिला. तुतारी वाजू लागली. रणवाद्यांचा नाद आकाशात निनादू लागला. सैनिक हुकमाचीच वाट पाहात होते. ते आपली हत्यारे सरसावत त्वेषाने बाहेर पडले. पांढरी वस्त्रे धारण करून राणी दुर्गावती आपल्या पांढऱ्या घोड्यावर बसून सैन्यापुढे चालली होती. तिच्या तलवारीचे टोक तिच्या शौर्याची साक्ष देत होते. ती तेजाने तळपत होती. तिने 'हरहर महादेव' अशी घोषणा केली. तशी सैन्याच्या पण 'हर हर महादेव' च्या गर्जनेने आसमंत निनादून गेले.

राणीने घोड्याला टाच दिली. तिचा घोडा हवेसारखा भरधाव निघाला. सैनिक पण तिच्या मागून झपाट्याने निघाले. ज्याप्रमाणे वाघ आपल्या शिकारीवर झडप घालतो त्याप्रमाणे गोंड सैनिक मोंगल सैन्यावर तुटून पडले. तथापी आसफखा त्यांच्याशी लढण्यास टपून बसला होता. परंतु हल्ल्याचा जोर इतका होता की, त्या मोंगल सैन्याचे धैर्य एकदम खचून ते मागे हटू लागले. तरीसुद्धा ते थोडेफार लढत होतेच. परंतु मनाने भ्यालेले असल्यामुळे ते चांगली लढत देत नव्हते. ते राणीच्या सैन्या-समोर शक्तीहीन व नेभळट दिसत होते. त्यांचा सुसंघटीतपणा विस्कळीत झाला होता. राणीचा उत्साह वाढत होता. ती आपल्या सैनिकांना उत्तेजन देत तीरासारखी मोंगलांच्या सैन्याला कापत आत घुसली आणि साक्षात् दुर्गादेवीसारखी राक्षसाचा संहार करू लागली पाहता पाहता हजारोंच्या संख्येने सैन्य मारले जात होते. रक्ताच्या नद्या वाहू लागल्या. मोंगल



सैन्यात गोंधळ माजला व कोणाचा कोणाला पत्ता राहिला नाही. त्यामुळे सैन्य भयभीत व कमजोर झाले. त्यांचे धैर्य खचले आणि जशी वाट मिळेल तसे पळत सुटले. मर्शांच्या शेवटी हत्तीवर आसफखा उभा राहून आपली सेना भयभीत झालेली पाहात होता. पहिल्याच झटापटीत अशी स्थिती होईल असे त्यास वाटले नव्हते. पण आता त्याचा काही उपयोग नव्हता. त्याच्यापाशी पण स्वतःचे असे धाडस नव्हतेच. पुढे येऊन सैनिकांना उत्तेजन देणे व त्यांना धीर देणे दूरच राहिले! राणीला पाहून तर तो गलितगात्र झाला. तरी युद्ध चालले होतेच. तलवारी एकमेकांस भिडत या. प्रेतांचा खच, रक्ताचे पाट वाहात होते. परंतु दोन्ही पक्षांची ही

लढाई फार काळ टिकली नाही. मोंगलांचे पाय उखडले व त्यांचे सैन्य सैरावैरा पळत सुटले. ते पाहून आसफखां रणांगणातून मागे फिरला व पळून एकदाचा श्वास घेण्यास थांबला. सैन्य पण थांबले.

राणी आनंदाने ललकारत परत फिरली. गोंड लोकांचा आनंद काय विचारावा ? आपल्यापेक्षा अडीच पट असलेल्या मोंगल सैन्याची दाणादाण करणे सोपे काम नव्हते. राणीने सर्व सैन्यास राजधानीत परत फिरण्याचा हुकूम दिला. आता तिने मोकळ्या मैदानात युद्ध न करता गढमंडळच्या आसपास व किल्ल्याच्या आत राहून लढण्याचा निर्धार केला होता. आसफखांच्या अफाट सैन्याला तिने पाहिले व आपला विचार पक्का केला. राजधानीत येताच लगेच सैन्याने चोहूबाजूने किल्ल्याची नाकेबंदी केली आणि पहिल्यांदाच मिळालेल्या विजयाच्या धुंदीत सर्वजण राणी दुर्गावतीचे शौर्य व धाडस यांची प्रशंसा करू लागले.

तिकडे पराभूत झालेला आसफखां आपली लाज झाकण्याचा प्रयत्न करत होता. त्याने आपल्या सैनिकांना आणि मोठ-मोठे हुद्देदार, नायब वगैरे लोकांना बोलावून खूप दटावले व त्यांच्या मित्रेपणाचा धिक्कार केला. सर्वजण शांत होते, कोणीही काही बोलत नव्हते. ते स्वतःलाच दोष लावत होते. काय करणार बिचारे, नोकर होते ना ? त्यांना काही बोलण्याचा अधिकार नव्हता ना ? सुभेदारसाहेब आपणच भित्रे आहात असे ते म्हणू शकत नव्हते. मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार ? शेवटी आसफखाने त्यांना कडक शब्दांमध्ये सांगितले की सर्व सैन्यास एकत्र करून लढाईची तयारी करा व कसेही करून जय झालाच पाहिजे. सर्वजण त्यास सलाम करून आपापल्या तंबूत चालते झाले.

सर्वजण गेल्यानंतर आसफखां काळजी करत तसाच बसून होता. त्याचा या लढाईत जर पराभव झाला तर तो कोठेच तोंड काढू शकत नव्हता, त्याची सुभेदारी गेली असती आणि तो सम्राट अकबरच्या दृष्टीने नेहमीच

मित्रा व मूर्ख ठरला असता म्हणून त्यास काहीतरी उपाय शोधून काढावयास पाहिजे होता की जेणे करून साप मारला जाईल पण दंडा शाबूत राहील. जर गोंडवानावर अकबरचा अधिकार होईल व तोही युद्ध न करता तर मग आपले वजन अकबरापाशी राहील. पण हे कसे शक्य आहे?

एकदम त्याला एक युक्ती सुचली. त्याने टाळी वाजवून द्वारपालास आत बोलावले. मग त्यास कोणाला तरी बोलावून आणण्यास सांगितले. थोड्या वेळाने एक पांढरी दाढी असलेला माणूस आत आला. आसफखा त्याच्याजवळ बसून बराच वेळ गोष्टी करत होता. दुसरे दिवशी तोच दाढीवाला माणूस हातात एक पांढरे निशाण घेऊन गढमंडळच्या दिशेने गेला. राणीच्या सैनिकाने तावडतोब राणीस सूचना दिली की, आसफखाचा कोणीतरी बातमीदार हातमिळवणी करण्यासाठी येत आहे. राणी मनातून फार खूष झाली. तिने नगर-प्रमुखास बोलावून हुकूम दिला की तू स्वतः पुढे होऊन सन्मानपूर्वक त्या शांतीदूतास घेऊन ये. नगर-प्रमुख त्यास सामोरा गेला व राणीकडे घेऊन आला.

राणीने त्यास बसण्यास सांगितले. तो बसत असताना म्हणाला, ' मी सुभेदार हजरत आसफखांचा निरोप घेऊन आलो आहे. '

राणी मान हलवून म्हणाली, ' सांगा काय निरोप आहे? '

दूत आदरपूर्वक बोलत होता. ' सुभेदारसाहेबांचा प्रस्ताव असा आहे, की आपण राजकुमारांना शाहन्शाह अकबर यांचेकडे दिल्लीला पाठवून दिले तर लढाई बंद करून तह केला जाईल आणि अशा प्रकारे शत्रुत्व नाहीसे होऊन मित्रत्व राहील. '

राणी बोलली, ' ठीक आहे! परंतु येथील राज्यकारभार कोण पाहणार! '

' आपण! आणि जेव्हा राजकुमार मोठे होतील तेव्हा ते स्वतः इकडे येऊन राज्यकारभार करतील. ' दूत अगदी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तयार करून आला होता.

राणी हसून बोलली, 'आपले सुभेदारसाहेब विचार करण्यात असमर्थ आहेत असे वाटते. काय खांसाहेब, लढाईत पराजय कोणाचा झाला ? मी काही रणांगणातून पळ काढला नाही. आसफखाने लढाईतून पळ काढला आहे. पराजय त्यांचा झाला आहे.'

म्हातारे खासाहेब खाली मान घालून बोलले, 'होय आपण म्हणता ते बरोबर आहे.'

'तर मग मी आपल्या पुत्रास दिल्लीला पाठवणार की तुमच्या आसफखांचा किंवा अकबरचा मुलगा माझ्याकडे पाठवाल ? आपल्या सुभेदारला सांगा की मित्रत्व पाहिजे असल्यास लवकर कोणाला तरी माझ्या स्वाधीन करा, नाहीतर मी दिल्लीवर हल्ला करीन. गोंडवानास त्रास देऊन त्यांनी फार वाईट कृत्य केले आहे. येथे शूर वीर राहतात. भित्रे व बुजरे लोक राहात नाहीत. समजले ? चालू लागा.'

दूताने डोके वर करून राणीकडे पाहिले आणि उठून उभा राहिला. राणीने आपल्या अधिकारवाणीने पुन्हा सांगितले, 'मला तावडतोब याचे उत्तर मिळाले पाहिजे. मी जास्त दिवस थांबू शकत नाही. आपण हे सर्व चांगल्या प्रकारे आसफखांला समजावून सांगा. मी पुन्हा असे कृत्य सहन करणार नाही.'

दूत सलाम करून बाहेर आला. त्याला गढमंडळच्या बाहेर पहारेकऱ्याने पोहोचवून दिले. दूताने आसफखांजवळ येऊन काय बोलणे झाले ते सर्व सांगितले. आणि तो शेवटी म्हणाला, 'असा अपमान करून घेण्यापेक्षा लढाई करता करता मरण आले तर जास्त चांगले आहे.'

आसफखांचे तोंड उतरून गेले. त्याचा हा दुसऱ्यांदा अपमान झाला होता. त्याला फार राग आला व आपण असा भित्रेपणा कशास दाखवला ? राणी दुर्गावतीचा आपण पराभव करू शकत नाही तर निदान वीराप्रमाणे लढता लढता प्राण तरी अर्पण करायचे ! किती मूर्खपणा झाला ? असे तो

स्वतःचे स्वतःला बोलू लागला. पुरुषासारखा पुरुष असून स्त्रीच्यापुढे मान वाकवणे म्हणजे थोड्या पाण्यात बुडून मरण्यासारखे आहे. त्याने मान वर केली. 'तू आता जसे बोललास तसेच मी करावयाचे ठरवले आहे. गढमंडळचा पराभव नाही केला तर नावाचा आसफखां नाही. तू जा.'

तो म्हातारा सलाम करून निघून जातो. नंतर थोड्या वेळाने आसफखांने पुन्हा सर्व शिपायांना आणि सरदार-नायव यांना बोलावून दुसरे दिवशी खूप जोराचा हल्ला करावयाचा असे सांगितले. त्यांनी आपला हाही विचार सैन्याला सांगितला, की पहिल्याने तोफांनी गोळावार खूप करावयाचा की त्यामुळे सगळे नगर जळून जाईल. व नंतर सर्व सैन्याने एकदम किल्ल्यावर हल्ला करून तो हस्तगत करावयाचा, असा सर्व बेत ठरला. सगळ्यांनी आसफखांच्या विचाराचे समर्थन केले. आणि सगळ्यांनी चांगल्या तऱ्हेने धडक द्यावयाची हा निश्चय केला. आसफखाने कामाची वाटणी केली. आणि प्रत्येकाने खूप हुषारीने व धाडसाने जोराचा हल्ला करायचा अशी आज्ञा केली. सर्वजण आपल्या तंबूत परत गेले. आसफखांसुद्धा आपल्या तंबूतून बाहेर आला आणि घोड्यावर बसून सैन्यामध्ये हिंडून उद्याच्या हल्ल्या-बाबतच्या सूचना देत त्यांना धीर देत होता. रात्र बरीच झाली होती. तरीसुद्धा आसफखा अजून सैन्यात फिरतच होता. नंतर बऱ्याच उशीराने तो परत आला. तो येऊन बसतोय तोच द्वारपालाने येऊन त्यास सांगितले की, 'गरीब परवरांना गढमंडळचा कोणीतरी एक माणूस येऊन भेटण्याची इच्छा दर्शवीत आहे.' आसफखांने आश्चर्याने त्याजकडे पाहून म्हटले–

'गढमंडळचा?'

'होय गरीब परवर.'

'त्याला आत पाठवून दे.'

द्वारपाल बाहेर गेला. थोड्या वेळाने एक वृद्ध व्यक्ती आत आली. आसफखा त्याला नीट निरखून म्हणाला–

क्रमांक ... नोंद दि.

'आपण गढमंडळ्हून आला आहात?'

'होय, मी गोंडवानाचा एक सरदार आहे. आणि हे सत्य आहे त्याची ही खूण.' असे म्हणून त्याने आपल्या अंगरख्यातून एक सोनेरी पदक काढून दाखवले.

आसफखांने बसण्याची खूण केली. नंतर पुन्हा विचारले की, 'आपण इकडे कसे काय आलात?'

सरदार म्हणाला, 'मी आपणास मदत करण्यास आलो आहे. राणी दुर्गावतीचा मी बदला घेणार आहे. तिने माझ्या मोठ्या भावास मारले आहे.' आसफखां ढोंगीपणाने म्हणाला, 'ओहो! फारच दुष्ट, कृतघ्न स्त्री आहे. हे राज्य स्थापन करण्यास आपण लोकांनी रक्त आणि घाम गाळून फार कष्ट घेतले आहेत आणि तुमच्याशीच अशी वागणूक! आपल्या भावाने कधी कोणा हलक्या जातीच्या माणसाची कत्तल केली असली तरी काय झाले? त्या माणसाची अशी काय योग्यता होती?' आसफखां वरवर रोष दाखवीत होता, तथापी तो मनातून फार आनंदित झाला होता.

सरदार दुःखी स्वराने म्हणाला– 'ही गोष्ट मी व इतर लोकांनी दुर्गावतीना समजावून सांगितली होती. तरीसुद्धा त्यांनी ऐकले नाही. कारण दुर्गावती म्हणाल्या, 'खुनास खून' अशी शिक्षा झालीच पाहिजे. म्हणून त्यास मृत्यूची शिक्षा दिली. मी पण मनातून सूड घेण्यासाठी वाट बघत होतो. भगवान कृपेने आता तशी संधी आली आहे. तेव्हा मला सांगा की मी आपली काय सेवा करू? की जेणे करून आपण राणीचा पराभव करू शकाल. शिवाय एकंदरीत लढाईचे स्वरूप पाहता राणीच्या सैन्यापुढे आपले सैन्य भित्रे व कमजोर वाटते.'

आसफखा ही चांगली संधी चालून आलेली पाहून अपमानाचा हा कडू घोट गिळून गप्प बसला होता. त्याने खोटेच होयला होय म्हणून मान

हलवली. 'आपले म्हणणे बरोबर आहे. असे असणे शक्य आहे. पण ते असू द्या. आपल्या मदतीचे काय? आपण मदत कशी करणार हे मला माहीत नाही. ते आपणच समजू शकता! होय, मी मात्र आपल्याला वचन देतो की आपण जर मदत केली तर सुभेदारीचा हुद्दा मी आपल्याला भेट करीन.'

सरदाराने त्यास झालेला आनंद दाखवला नाही. थोड्या वेळाने तो बोलला—'ह्या गोष्टीवर नंतर विचार करू. मी जर आपल्याला मदत करणार तर माझ्यासाठी आपण काही कराल ना?'

'बिल्कूल, ठीक, ह्यामध्ये काही संशय नको.' आसफखा धूर्ततेने हसला. त्याने पुन्हा सरदाराचा सच्चेपणा पारखण्यासाठी विचारले, 'ह्या वेळी दुर्गावती जवळ किती सैन्य आहे?'

'जवळ जवळ वीस हजार फौज आणि एक हजार हत्ती आहेत.' शिवाय त्याने सैन्याविषयी आणखीन गुप्त भेद सांगितले. ते ऐकून आसफखा मनातून खूप झाला. त्याचा सरदारावर विश्वास बसला होता. नंतर त्यास म्हणाला, 'उद्या सकाळी आम्ही हल्ला करणार आहोत. तेव्हा आपण शक्य तो तिकडील सैनेला चिथवून देण्याचा प्रयत्न करा.'

'होय, हे काम मी जरूर करीन.' आता मी जातो. सरदार उठून उभा राहिला. आसफखाने त्यास थांबवून लगेच द्वारपालास बोलावले. आणि बक्षिसाच्या थैल्या आणण्याचा हुकूम दिला. आसफखाने त्या सरदारापुढे केल्या. सरदाराच्या चेहऱ्याचे भाव बदलले. तो म्हणाला, 'हे काय?'

'शिपायांना फितूर करण्यासाठी हे दिले आहे.' सरदाराने हसून त्या थैल्या घेतल्या आणि बाहेर पडला. सुभेदार आनंदाने बेहोष होऊन नाचू लागला.

## बारा

**दुसरे** दिवशी आसफखांच्या तोफा भयंकर गर्जना करत आग ओकत गढमंडळच्या दिशेने निघाल्या. तिकडे राणी पण तयार होतीच. या वेळी ती हत्तीवर बसून सैन्याचे संचलन करत होती. तिचा हुकूम मिळताच वीर गोंडांनी गोळ्यांचा वर्षाव केला. परंतु तोफखान्यापुढे बंदुकीच्या गोळ्यांचा किती व कसा टिकाव लागणार? आसफखांच्या मोठमोठ्या तोफा आग फेकून गोंड सैन्याला भाजून काढीत होत्या. मृत सैनिकांचे ढीग पडत होते. सैन्याची अशी दशा पाहून राणी फार भयभीत झाली. तिने विचार केला की, काही वेळ जर हे असेच चालू राहिले तर गोंडची सेना जळून जाईल किंवा रणांगणातून काढता पाय घेईल. तेव्हा काय करावे? राणी फार विचारात पडली. कारण तिच्याजवळ दुसरा असा काही उपाय नव्हता की जेणेकरून वीटेने दगडाला उत्तर देऊ शकेल.

काही वेळ असेच युद्ध चालले होते. मोगलांचा जोर वाढत गेला. आणि गोंड मागे हटू लागले. तरी सुद्धा तसेच लढत होते. काय करणार? लढणे वा मरणे हेच त्यांना माहीत होते. राणीला पण कळून चुकले की आपला पराजय होणार. म्हणून तिने हत्तीला पुढे घालून सैन्याला आव्हान देऊन जोराने ओरडून सांगितले, 'वीरांनो पराधीन जिणे जगण्यापेक्षा मरणे जास्त चांगले आहे. गढमंडळचा सन्मान राखावयाचा असेल, तर आपल्या शरीराने तोफांची तोंडे भरा. तोफा उडवणाऱ्यांची डोकी कापा. मृत्यू एकदाच येतो वरचे वर मरण नाही. मग रणांगणावर मृत्यू चांगला. त्याने स्वर्ग प्राप्ती होते. चला, पुढे चला.' राणीच्या या आवेशपूर्ण शब्दाने जादू केली. सैनिकांचा उत्साह परत आला व ते दुप्पट उत्साहाने, त्वेषाने

निघाले. त्यांचे रक्त सळसळत होते. 'हर हर महादेवाच्या' जयघोषात तळपत्या तलवारीसह ते तोफखान्यांच्या दिशेकडे वाऱ्यासारखे धावत गेले. तोफेच्या गोळ्यांनी शेकडो शिपाई मृत्यूमुखी पडले. परंतु प्राण देणारे प्राण घेणाऱ्यांपेक्षा अधिक शक्तीमान असतात. शेवटी त्यांतील काहीं सैनिक तोफांच्या जवळ जाऊन पोहोचले व त्यांनी तोफचींना ठार केले. आणि तोफांची तोंडे शत्रूकडे फिरवली. मग काय पाहिजे? 'मियाँ की जूती मियाँ के सर पर बजने लगी.' मोंगल सैन्यात हाहाःकार उडाला. आसफखांने आपल्या सैन्यास एकत्रीत करण्याचा प्रयत्न केला. परंतु जी सेना आगीशी खेळू शकते व आग ओकणाऱ्या तोफांच्या तोंडासमोर घुसण्याचे धाडस करू शकते, अशा सेनेपुढे कोण टिकणार? मोंगल सेनेत गोंधळ, गडबड माजून राहिला. गोंड तोफा डागत होते व मोंगल सैन्याला पळता भुई थोडी झाली. 'हरहर महादेव'च्या घोषणांनी आकाश निनादत होते. राणी बेहोष होऊन सैन्यातून विजेसारखी फिरत, सैन्याला उत्तेजन देत होती. दुर्गावतीचा जयजयकार होत राहिला. जो आतापर्यंत विजयाची स्वप्ने पाहात होता, तोच यावेळी आपले काळे तोंड लपवून जीव घेऊन पळत सुटला. अंधार पडत चालला म्हणून राणीने सैनिकांना पुढे जाण्याचे थांबवून परत फिरण्याचा हुकूम दिला. सैन्य माघारी आले. गढमंडळ जयजयकारांनी भरून गेले. लोकांच्या आनंदाला व उत्साहास भरती आली होती. ते नानातऱ्हेने आपला आनंद व्यक्त करत होते. सम्राट अकबरच्या अफाट तोफखान्यासह सेनेला दोनदा पराजित करणे सोपे काम नव्हते? सगळे नगर आनंदात धुंद झाले होते. याच वेळी राणीने तावडतोब आपल्या खास सरदारांची बैठक बोलावली होती. राणी बोलत होती— 'माझे मते काही निवडक सैन्य घेऊन मोंगलावर पुन्हा जोराचा हल्ला करावा व शत्रूला पूर्णपणे पराभूत करून हाकलून द्यावा. तुम्हास काय वाटते?'

त्यातील एक सरदार म्हणाला, 'आताच?'

'आता नाही, अर्धी रात्र ढळल्यानंतर. म्हणजे मोंगलाची जी काय थोडी शक्ती व हिंमत आहे, ती पण नाहीशी होईल. शिवाय संपत्ती व काही लूटही मिळेल.'

राणीचा जो एक सरदार काल आसफखांस भेटून आला होता तो म्हणाला, 'त्यांच्यात शक्ती काहीच राहिली नाही, राणीजी! ते काय हल्ला करणार? ते आपले काळे तोंड घेऊन पळून गेले.'

राणी म्हणाली, 'बरोबर आहे तुमचे म्हणणे! परंतु हा शत्रूचा पराभव अर्धवट सापाला ठेचल्यासारखा झाला आहे. तेव्हा त्याला असा सोडून उपयोगी नाही. संधी मिळाली आहे, तिचा फायदा घेऊन त्याला पुरता ठेचला पाहिजे. नाहीतर केव्हा डोके वर काढील नेम नाही.'

सरदार क्षणभर विचार करून म्हणाला, 'होय, आपले म्हणणे योग्य आहे. आपण आज्ञा कराल तर आम्ही तिचे पालन करण्यास तयार आहोत. तथापी हे पक्के आहे की त्यांना फौजेची आणखीन मदत येण्यास दोन दिवस लागतील. तोपर्यंत ते हल्ला करू शकत नाहीत. आजची ही आनंदाची रात्र हसून, खेळून घालवावी, हे उत्तम. सैनिकांची पण हीच इच्छा आहे. यापूर्वी जी लढाई झाली, तीत कितीतरी सैनिक मारले गेले आहेत. त्यानंतरचा हा विजय. अर्धवट राहिलेल्या विजयाचे काम पुरे होईलच! परंतु सर्व सैन्याला आजची रात्र मजेत घालवावी असे वाटते.'

राणीचा विचार ऐकून सैनिक गप्प बसले होते. पण ह्या सरदाराने असे बोलल्यावर बाकीच्यांनीही बोलण्याचे धाडस केले. त्यांना या देशद्रोही सरदाराची काही एक कल्पना नव्हती. अर्थात राणीला त्यांचे म्हणणे मान्य करावे लागले. तिच्याजवळ दुसरा इलाजच नव्हता. ती वेळच तशी होती. म्हणून तिने उत्सव करण्याची परवानगी दिली. सैनिक आनंदाचा घोष करत महालाबाहेर गेले व आनंदाने बेहोश झाले. देशद्रोही सरदार

आपल्या कामात सफल झाला. तो किल्ल्याच्या बाहेर आला व घोड्यावर बसून आसफखांच्या छावणीकडे निघाला.

सुभेदार आसफखां एकटा चिंता करत बसला होता. त्याचा दोनदा पराभव झाला होता. त्यामुळे कोणाला तोंड दाखवण्याची त्याला लाज वाटत होती. सरदाराला पाहिल्यावर तो शरमिंदा होऊन म्हणाला, ' आपल्या मदतीने सुद्धा मी दुर्गावतीचा पराभव करू शकलो नाही. '

मध्येच सरदार म्हणाला, ' माझ्यापाशी वेळ फार कमी आहे. मला परत जावयास पाहिजे. अजूनही वेळ गेली नाही. फक्त धाडसाची शर्थ करावी लागेल म्हणजे काम होईल. '

जसा बुडत्यास काडीचा आधार वाटतो त्याप्रमाणे आसफखांने आश्चर्याने विचारले, ' काम कसे काय होईल ? ' मग सरदाराने त्यास सर्व सांगितले. या वेळी गढमंडळचे लोक विजय-उत्सव साजरा करत आहेत. रात्रभर ते असेच धुंद होऊन राहणार व गडबड, गोंधळास ऊत येणार तेव्हा आपण आपली फौज एकत्रित करा. आणि जेव्हा राजधानी पहाटे गाढ झोपेत असेल त्या वेळी हल्ला करा. निश्चितच आपणास जय मिळेल. मोठ्या कठीण प्रयत्नाने मी हा क्षण घडवून आणला आहे. अशी संधी हातातून गेली तर मग पुन्हा काही येणार नाही. ' तो उठून उभा राहिला.

' आपण परत जाणार आहात ? ' आसफखां उठून उभा राहात म्हणाला

' होय मला तावडतोब गेलेच पाहिजे. '

आसफखां त्याला दूरपर्यंत सोडण्यास गेला आणि उद्या पूर्णपणे ताकद लावून आक्रमण करण्याचे वचन दिले. सरदाराने घोड्यास टाच दिली व त्याचा निरोप घेतला.

# तेरा

**एकाएकी** अचानक असा जोरदार हल्ला सुरू झाला. सगळीकडे गडबड व गोंधळ माजला. अजून थोडी रात्र असल्याकारणाने काही दिसत नव्हते. बराच वेळ कोणास काही समजेना. डोळे उघडतात न उघडतात तोच शिपायांची डोकी धडावेगळी होऊ लागली. रक्ताची कारंजी चोहोकडून उसळू लागली. एकेक शिपायाच्या डोक्यावर दोन दोन मोंगल शिपाई तळपत्या तलवारी घेऊन यमदूताप्रमाणे गोंड शिपायांना कंठस्नान घालत होते. रक्ताच्या नद्यामध्ये प्रेतांचे पूल बनत होते. गढमंडळ मध्ये गोंधळ चालला होता. राणीने आपल्या कपाळावर हात मारून घेतले. तिच्या सर्व प्रयत्नांवर पाणी पडले होते. राज्याच्या संरक्षणासाठी तिने खूप कष्ट घेतले होते. रक्त व घाम गाळून उभा केलेला महल पाहता पाहता ढासळू लागला. परंतु आता दुःख करण्यात काही फायदा नव्हता. जोपर्यंत जीवात जीव आहे, तोपर्यंत लढणे हा एकच मार्ग होता. शत्रूला शरण जाणे ही कल्पना तिच्या मनाला शिवत पण नव्हती. ती शत्रूला दाखवून देणार होती की, एक अबला स्त्री आपल्या इभ्रती-करिता व स्वातंत्र्यासाठी किती मोठे बलिदान करू शकते !

ती तलवार, बरची घेऊन बाहेर पडली. सैन्यास हुकूम दिला. परंतु त्या गोंधळात कसे काय ऐकू जाणार ? सैनिकांनी लढण्याची कशी तरी तयारी केली. राणीने सैन्याची दोन भागात विभागणी करून, एक पथक तिने आपल्या जवळ ठेवले व दुसरे पथक वीरनारायणच्या स्वाधीन केले.

मोंगल सैन्य तेजाने पुढे सरकत होते. राणीने वीर गोंड सैनिकांना पुन्हा उत्तेजित करून लढण्याचे आव्हान दिले. त्यावरोबर दोन्ही सेना

एकमेकांवर तुटून पडल्या. थोडा वेळ लढाई फार भयंकर अशी झाली. दोन्ही पक्षांचे खूप सैनिक मारले गेले. परंतु गोंड सैन्याचे धैर्य खचले. आणि ते मागे हटू लागले. तोच अचानक कोणीतरी वीर नारायणावर तलवारीने प्रहार केला आणि तो घोड्यावरून खाली पडला.

राणीने दुरूनच आपल्या मुलाला घोड्यावरून पडत असताना पाहिले आणि त्याच्यावर दुसरा वार होण्याच्या आत ती त्याच्याजवळ गेली. तिचे मातृहृदय भरून आले. ती व्याकूळ झाली. तिने झटकन् रक्ताने भरलेल्या वीर नारायणास उचलले आणि काही निवडक सैनिकांच्या आधाराने त्यास पाठीमागे घेऊन जाण्यास सांगितले. वीरपुत्राने जाता-जाता आपल्या आईस धीर दिला व लढाईकडे लक्ष देण्यास सांगितले. ज्या मुलाकरिता आईने आपले सर्वस्व अर्पण केले त्या मुलाची ही स्थिती पाहून ती बेहोष होऊन लढू लागली. तथापी ती आपल्या घायाळ झालेल्या पुत्राकडे वळवळून सारखी बघत होती. तिचे लढाईतून लक्ष उडाले आणि धैर्य गळून गेले. आपल्या पुत्रासाठी कोणत्याही मातेची अशी स्थिती होणे स्वाभाविक होते. तरी पुन्हा पुन्हा सपासप तळपत्या तलवारीचे विजेप्रमाणे घाव घालत, शत्रूची सेना कापत, ती रणांगणात फिरत होती. शत्रूसुद्धा हे दृश्य पाहून दंग झाला होता. अधूनमधून राणी पुत्राच्या काळजीने दुःखीत होई. त्यामुळे लढाईत खंड पडत होता.

तिच्या या बेसावधपणाचा फायदा शत्रूने घेतला. आणि सू सू करत एक बाण तिच्या डोळ्यास येऊन लागला. डोळ्यातून रक्ताची धार लागली. तिने आपल्या डोक्याचा फेटा काढून त्यावर पट्टी बांधली. आणि पुढे निघाली. तोच आणखीन एक बाण येऊन तिच्या शरीरात घुसला. तिने लगाम ओढून घोडा थांबवला. तिला आता समजून चुकले होते की, आपली वेळ आली आहे. पण आपण जिवंत मोंगलाच्या हाती न लागणे जास्त



चांगले आहे. ह्या विचाराने आपली कट्यार काढून तिने छातीमध्ये खुपसून घेतली.

जेव्हा ती जमिनीवर पडली त्यावेळी गोंड सैनिकाने राणीभोवती कडे केले. राणीच्या तोंडून अस्पष्ट शब्द बाहेर पडले. 'नाथ....मी आपल्या चरणांजवळ....कर्तव्य....पुरे करून....येत....आहे....नाथ....'

आणि एक शेवटचा श्वास घेऊन राणी पतीच्या भेटीस निघून गेली. तिची जीवन-ज्योत मालवली. शत्रू आपल्या दुष्ट नीतीमध्ये सफल झाला. देशभक्त अधारसिंह अकबरच्या राजधानीत नजर कैदेत तळमळत राहिला.

सुभेदार आसफखां मोठ्या डौलाने विजयाचा उत्सव साजरा करत होता. पण अकबर व आसफखांची इच्छा अपुरीच राहिली. राणी दुर्गावती जिवंत त्यांच्या हाती लागलीच नाही. उलट राणीबरोबर त्यास फार जबरदस्त लढत द्यावी लागली होती. शिवाय त्याचे अपरमीत असे नुकसान पण झाले ते वेगळेच! हा विजय खरा दुर्गावती राणीचाच होता. अशी ही रत्ने भारतमातेच्या गळ्यातच शोभायमान दिसतात.

□□□

अनुक्रम ........ वि. बा. वा.
क्रमांक ..... ९५१५ ...... नोंद दि. ..........

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
बा. क्र. १४०३८ नों दि ..........
वि. बाउ.वा. क्र. ..........

IRBK-0114038